ठाणे, शुक्रवार दि. १२ जुलै २०२४ वर्ष : १३, अंक : ७५ , पाने : ६, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

**प्रशासकीय अधिकारी की नव वतनदारी ?**

पुण्यात असलेल्या ट्रेनी आयएएस अधिकारी पूजा खेडकर या त्यांच्या वेगवेगळ्या कारनाम्यांमुळे चर्चेत आहेत. वरिष्ठ जिल्हाधिकाऱ्यांचे अँटी चेंबर बळकावणे, रुजू होण्याआधीच व्हॉट्स ॲप ......पान २ वर



**मुंबई नाशिक महामार्गावरील कामांची जिल्हाधिकारी शिनगारे यांनी केली पाहणी**

...पान ४ वर






# विधानसभा निवडणुकीत २८८ पैकी २२५ पेक्षा जास्त जागा जिंकणार, शरद पवारांचा निर्धार





मुंबई : लोकसभा निवडणुकानंतर राज्यातील राजकारणात काही बदलाचे वारे वाहताना दिसत आहे. गेल्या काही दिवसांपासून भाजपला सोडचिठ्ठी देत महाविकास आघाडीतील पक्षात प्रवेश केला जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यात, मराठवाड्याती दोन ते तीन नेत्यांनी भाजपला सोडचिठ्ठी दिली आहे. माजी गृहराज्यमंत्री डॉ. माधव किन्हाळकर यांनी भाजपच्या सर्वच पदांचा राजीनामा दिला होता, त्यानंतर, आज माजी आमदार सुधाकर भालेराव यांनी भाजपाच्या सदस्यत्वासह सर्वच पदांचा राजीनामा देत शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. मुंबईतील यशवंतराव चव्हाण सभागृहात शरद पवारांच्या प्रमुख उपस्थित सुधाकर भालेराव यांचा राष्ट्रवादीत प्रवेश झाला आहे. या प्रवेशावेळी, बोलताना शरद पवार यांनी विधानसभा निवडणुकांचं रणशिंग फुंकल्याचं दिसून आलं. तसेच, विधानसभा (तळवहरपीरलहर) निवडणुकीत महाविकास आघाडीला किती जागा मिळतील, याचे गणितही त्यांनी सांगितलं.

## विधानसभेला २२५ जागा जिंकू

सुधाकरराव भालेराव आणि इतर नेते आले आहेत, देवळालीतील देखील कार्यकर्ते आले आहेत. हे घर तुमच्या सर्वांचं आहे, सध्या महाराष्ट्र चुकीच्या लोकांच्या हातात आहे. हे चित्र बदलवण्याच्या दृष्टीनं लोकसभेत मतदारांनी निकाल दिला. लोकसभा निवडणुकीत ४८ पैकी ३१ लोकांना शक्ती देऊन वेगळा इतिहास घडवला. त्यामध्ये, आपल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या ८ लोकांना निवडून दिलं, ही सुरुवात आहे. आता, विधानसभेच्या २८८ जागा आहेत, त्या जागेत २२५ पेक्षा जास्त जागा आपल्या निवडून येतील, असे भाकितच शरद पवारांनी सांगितलं. महाराष्ट्रातील राजकारण बदलण्याची अपेक्षा आहे, कष्ट करणाऱ्यांना शक्ती देणारं राज्य आणुया, सत्तेत येत लोकांच्या जीवनात बदल आणण्याचा प्रयत्न करूयात. उद्योजक, व्यापारी असेल कोणताही घटक असेल देशात एक शक्तिशाली महाराष्ट्र राज्य निर्माण करूयात, असे म्हणत शरद पवार यांनी सुधाकर भालेराव यांच्या पक्षप्रवेशानंतर भाषणातून विधानसभेचं रणशिंग फुंकल्याचं दिसून आलं.




# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## प्रशासकीय अधिकारी की नव वतनदारी ?

पुण्यात असलेल्या ट्रेनी आयएएस अधिकारी पूजा खेडकर या त्यांच्या वेगवेगळ्या कारनाम्यांमुळे चर्चेत आहेत. वरिष्ठ जिल्हाधिकाऱ्यांचे अँटी चेंबर बळकावणे, रुजू होण्याआधीच व्हॉट्स अॅप मेसेज पाठवून केबीन तयार ठेवा सांगणं, ऑडी या खासगी कारवर लाल आणि निळा अंबर दिवा लावणे या गोष्टींमुळे त्या चर्चेत आल्या आहेत. पूजा खेडकर यांच्या आईने पोलिसांना आणि माध्यमांना दमदाटी केली आहे.पुण्यातल्या प्रोबेशनरी सनदी अधिकारी पूजा खेडकर यांची सध्या जोरदार चर्चा सुरु झाली आहे. याचं कारण त्यांची पुण्यातून तडकाफडकी वाशिमला बदली करण्यात आली आहे. त्यांची ओबीसी नॉन क्रिमिलेयर आणि बहुविकलांगता (मल्टिपल डिसॅबिलिटी) या दोन प्रकारांतून त्यांची निवड झाल्याचे शासनाच्या संकेतस्थळावर दिसून येत आहे. पूजा खेडकर यांच्या नॉन क्रिमिलेयरसाठीच्या पात्रतेबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. तसेच बहुविकलांगता असूनही त्या वैद्यकीय चाचणीसाठी गेल्या नव्हत्या. यामुळे अधिकार गाजवण्यासाठी त्या पदावर आल्या आहेत की लोकांची कामे करण्यासाठी हा प्रश्न निर्माण होत आहे. पूजा खेडकर या आता वाशिमच्या जिल्हाधिकारी असणार आहेत. पूजा खेडकर यांनी चमकोगिरी केल्याने त्यांची बदली करण्यात आली आहे. व्हिआयपी नंबरप्लेट असलेल्या ऑडी कारला लाल आणि निळा दिवा लावणे, पुणे जिल्ह्यात रुजू होण्यापूर्वीच निवासी जिल्हाधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांना व्हॉट्स अॅप मेसेज करुन त्यांच्यासाठी स्वतंत्र आसन व्यवस्था, कार, निवासस्थान आणि शिपाई या संबंधीची मागणी वारंवर केली. तसेच परिविक्षाधीन (प्रोबेशनरी) सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून रुजू झाल्यानंतर पहिल्याच दिवसापासून याबाबत विचारणा केली. असा आरोप खुद्द जिल्हाधिकाऱ्यांनी केला आहे. पूजा खेडकर यांच्या आई मनोरमा खेडकर यांनी माध्यम प्रतिनिधी व पोलिसांना अरेरावी केल्याचा व्हिडीओही समोर आला आहे. पोलीस चौकशीला आले असताना त्यांना बंगल्यात येऊ दिले नाही असा आरोपही त्यांच्यावर होत आहे. या बंगल्यात पाच आलिशान कार उभ्या आहेत. ऑडी कार कुणाच्या नावावर आहे? त्यावर लावलेला दिवा कुठे आहे? याची माहिती पोलिसांना घ्यायची होती. मात्र खेडकर यांनी अरेरावी केली व पोलिसांना येऊ दिले नाही. आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांनी जिल्हाधिकारी यांच्या कक्षाशेजारी आसन व्यवस्था करण्याची मागणी केली. प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांची जोरदार चर्चा होत आहे. २०२३ च्या बॅचच्या आयएएस अधिकारी असलेल्या पूजा खेडकर यांची प्रशिक्षणासाठी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात नियुक्ती केल्यानंतर त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दालन काबीज केले. तसेच खासगी ऑडी वाहनावर लाल दिवा लावला. त्या सध्या वाशिम येथे रुजू झाल्या. तसेच युपीएससी परीक्षेदरम्यान त्यांनी दिलेल्या मुलाखतीचा व्हिडीओही सध्या व्हायरल होत आहे. या मुलाखतीदरम्यान त्यांनी केलेले दावे खोटे असल्याचे अनेक लोक सांगत आहेत. तसेच त्यांची ओबीसी नॉन क्रिमिलेयर आणि बहुविकलांगता (मल्टिपल डिसॅबिलिटी) या दोन प्रकारांतून त्यांची निवड झाल्याचे शासनाच्या संकेतस्थळावर दिसून येत आहे. यावरही जोरदार टीका होत आहे. माहिती अधिकार कार्यकर्ते विजय कुंभार यांनी याबाबतची माहिती एक्सवर पोस्ट केली आहे. तसेच पूजा खेडकर यांनी ओबीसी नॉन क्रिमिलेयर प्रवर्गातून परीक्षेत यश मिळविल्याबद्दल कुंभार यांनी टीका करत कागदपत्रे समोर आणली आहेत. आयएएस पूजा खेडकर यांच्याकडे ११० एकर शेतजमीन असल्याचे समोर आले आहे. तसेच सहा प्लॉट्स आणि ७ फ्लॅट आहेत. ९०० ग्रॅम सोने आणि हिरे आहेत. त्यांच्याकडे १७ लाख रुपयांचे सोन्याचे घड्याळ आहे. ऑडीसह चार आलिशान गाड्या आहेत. तसेच दोन खासगी कंपन्यात त्यांची भागीदारी आहे.
त्यांच्याकडे एकूण १७ कोटींची मालमत्ता आहे. नॉन क्रिमिलेयरसाठी पालकांचे उत्पन्न आठ लाखांपेक्षा कमी असायला हवे. मात्र, खेडकर यांचे वडील दिलीप खेडकर यांनी २०२४ ची लोकसभा निवडणूक लढवताना सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात त्यांची मालमत्ता ४० कोटींहून अधिक असल्याचे दाखवले आहे. त्यामुळे त्यांच्या क्रिमिलेयर प्रमाणपत्राबद्दल साशंकता दिसते. त्यांनी वंचित बहुजन आघाडीकडून निवडणूक लढविली होती. वडील दिलीप खेडकर यांच्याशिवाय पूजा खडेकर यांच्याकडेही कोट्यवधीची संपत्ती असल्याचे समोर आले आहे. पूजा खेडकर यांच्यसंदर्भात समोर आलेल्या गोष्टी आणि जिल्हाधिकारी कार्यालयातील त्यांचे गैरवर्तन यामुळे त्यांच्याबद्दल चर्चा पाहायला मिळत आहे. हे प्रकरण दिल्लीपर्यंत पोहोचले असून याची दखल घेत पंतप्रधान कार्यालयाने पूजा खेडकर यांच्यासंदर्भातील अहवाल पुणे जिल्हाधिकाऱ्यांकडे मागितला आहे. त्यामुळे केंद्रीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी असणाऱ्या पूजा खेडकर यांच्यावर दिल्लीतूनही कारवाई होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आयएएस अधिकारी होणे हा प्रतिष्ठेचा विषय आहे. मात्र, एका प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्याची संशयास्पदरीत्या नियुक्ती व बदलीवरची प्रश्नचिन्हे आणि गैरवर्तणुकीमूळे प्रशासकीय सेवांत नववतनदारी निर्माण होत आहे का, असा प्रश्न निर्माण होत आहे. ज्यांच्या नियुक्तीवर प्रश्नचिन्ह आहे, अशा प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांची सध्या प्रसारमाध्यमांपासून समाजमाध्यमांपर्यंत चर्चा सुरू झाली आहे. शिपाई मिळत नसतानाही त्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांवर अरेरावी करणे, आलिशान खासगी गाडीवर लाल दिवा लावणे असे अनेक कारनामे या प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्याने पुण्यातील प्रशिक्षण काळात केल्याचे समोर आले आहे. याची गंभीर दखल घेत खुद्द पुण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी तसे सविस्तर पत्र राज्य शासनाला काही दिवसांपूर्वी लिहिले आहे. गैरवर्तनासाठी ही बदली आहे, असा उल्लेख नसून प्रशासकीय कारणांसाठी ही बदली आहे, असे त्यात नमूद असल्याने त्यावरही साहजिकच मोठे प्रश्नचिन्ह निर्माण आहे.

## आज विधान परिषद निवडणूक

**(पान १ वरून)** महायुतीला ११ पैकी १० जागा जिंकणे सोपे आहे, परंतु क्रॉस व्होटिंग झाले तर तीन महाविकास आघाडीचे उमेदवार विजयी होऊ शकतात. शरद पवार यांच्याकडे १२ आमदार आहेत. उद्धव ठाकरे यांच्याकडे १६ तर काँग्रेसकडे ३८ आमदार आहेत. या १२ उमेदवारांपैकी भाजपचे पाच उमेदवार सुरक्षित वाटतात, ते म्हणजे पंकजा मुंडे, परिणय फुके, सदाभाऊ खोत, अमित गोरखे, योगेश टिळेकर. महाविकास आघाडीमधून काँग्रेसचा १ उमेदवार आणि शिवसेना ठाकरे गटाचा एक उमेदवार मिलिंद नार्वेकर आणि प्रज्ञा सातव सहज विजयी होऊ शकतात. जयंत पाटील यांना जिंकायचे असेल तर त्यांच्यासाठी मतांचे व्यवस्थापन करावे लागेल.

## NEET-UG परीक्षा पुन्हा होणार ?

**(पान १ वरून)** मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर या याचिकांवर सुनावणी होणार आहे. NEET-UG प्रकरणी आज सुप्रीम कोर्टात पुन्हा एकदा महत्त्वाची सुनावणी होणार आहे. अशा परिस्थितीत छएएढ णत्र २०२४ ची परीक्षा रद्द करून छएएढ-णत्र परीक्षा पुन्हा होणार का याकडे सर्वांचे लक्ष लागलं आहे. सुप्रीम कोर्ट या याचिकेवर निर्णय देण्याची शक्यता आहे. केंद्र सरकार आणि छद्ध-च्या वतीने सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केल्यानंतर उइख ने ही प्रतिज्ञापत्र सादर केलं आहे. NEET-UG प्रकरणी विद्यार्थ्यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत कथित पेपर लीक प्रकरणाची फेरपरीक्षा आणि योग्य तपास करण्याची मागणी करण्यात आलीय. सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड, न्यायमूर्ती जेबी परडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर वैद्यकीय प्रवेश परीक्षेतील अनियमिततेशी संबंधित याचिकांवर सुनावणी सुरू आहे. केंद्र आणि NTA ने ५ मे रोजी झालेल्या परीक्षेत कोणत्याही प्रकारची मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाली नसल्याचं म्हटलं आहे. आता उइखने ही सर्वोच्च न्यायालयात उत्तर दाखल केले आहे. बुधवारी केंद्र सरकार आणि छद्ध- यांनी प्रतिज्ञापत्र दाखल केले होते. केंद्र सरकारने नीट परीक्षा पुन्हा घेणार नसल्याचं आधीच न्यायालयाला सांगितले आहे.

## कल्याणमधील ६३ एकर जमीन बिल्डरच्या घशात

**(पान १ वरून)** विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने अटी व शर्तीचा भंग करुन या कंपनीला फक्त चार कोटी रुपयांमध्ये विकला. शासनास देय रक्कम रुपये १ कोटी ६८ लाख ९३ हजार १४० या कंपनीने त्यांचा सारस्वत बँक खात्यातून जमा केलेली आहे. याचाच अर्थ शासनाची जमीन सुनियोजित मार्गाने म्हारळ सामुदायिक शेती सहकारी संस्थेला समोर करुन या कंपनीने बळकावली आहे. ते म्हणाले, ''ही कंपनी आणि अधिकाऱ्याने १२ दिवसात करारनामा करून, जमिनीचे व्हॅल्युएशन कमी दाखवून फक्त साडे चार कोटी रुपयात जमीन बिल्डरच्या घशात घातली. आणि सात हजार कोटींचा घोटाळा केला. यातून ३० हजार कोटी रुपये बिल्डर कमावणार आहे. या प्रकरणाची महसूल मंत्र्यांकडे सुनावणी झाली. त्यात एक सदस्यीय समिती नेमू आणि चौकशी करू असे महसूल मंत्र्यानी सांगितले.'' मात्र तीन महीने उलटून गेले आहेत तरी अद्याप चौकशी पूर्ण झालेली नाही. त्यास पुन्हा मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे सदर प्रकणाची महसूल मंत्र्याच्या आदेशानुसार एक महिन्याच्या आत चौकशी पूर्ण करण्यात यावी. तसेच अटी आणि शर्तीचा भंग झाल्यामुळे जमीन परत महसूल विभागाकडे जमा करावी, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली.

## जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत गट– क सरळ सेवा भरती २०२३ ....परिक्षा १८ जुलै पासून सुरू

**(पान १ वरून)** उमेदवारांनी जिल्हा परिषद ठाणे कार्यालयातील अधिकृत संकेतस्थळावरील आयबीपीएस द्वारे उपलब्ध करून दिलेल्या लिंकवरून हॉल तिकीट डाउनलोड करून घ्यावे. विशेष सुचना ज्या महिला उमेदवारांनी त्यांचे नाव बदलले आहे त्यांच्या बाबतीत त्यांनी मूळ राजपत्र अधिसूचना / त्यांचे विवाह प्रमाणपत्र सादर केल्यास परिक्षेस बसण्याची परवानगी दिली जाईल. अन्यथा महिला उमेदवारांना परिक्षेसाठी बसू दिले जाणार नाही याची दक्षता घ्यावी, अशी माहिती जिल्हा प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे.


### परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिका

ई-निविदा सूचना

ठाणे महानगरपालिका परिवहन सेवेकडील टाटा मार्कोपोलो बसेसच्या "वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणेसाठी फर्म/एजन्सी/गॅरेज मालक/मूळ उत्पादक यांच्याकडून आठ वर्षांच्या कालावधीसाठी सर्वसमावेशक सुटे भाग, असेंब्ली, वंगण, बॅटरी, टायर, युनिट्स (इंधन वगळून) इत्यादींच्या पुरवठ्यासह दोन लिफाफा पध्दतीने ई-निविदा मागविणेत येत आहेत. निविदा दस्तऐवज महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in वेबसाइटवर उपलब्ध आहेत. सदरील ई-निविदा सूचना व निविदा प्रपत्रे दि.१२/०७/२०२४ पासून दि.०१/०८/२०२४ रोजी १५.०० वा. पर्यंत अधिकृत संकेतस्थळ https://mahatenders.gov.in वर उपलब्ध आहेत. ई-निविदा दि.०१/०८/२०२४ रोजी १५.०० वा.पर्यंत स्विकारणेत येतील, व शक्य झाल्यास दि.०२/०८/२०२४ रोजी १६.०० वा. स्विकारलेल्या निविदा ऑनलाईन पध्दतीने उघडण्यांत येतील. निविदापूर्व बैठक दि.१९/०७/२०२४ रोजी १२.०० वा. मा.परिवहन व्यवस्थापक, प्रशासकीय भवन, वागळे आगार, वागळे इस्टेट, ठाणे (पश्चिम) यांचे कक्षामध्ये आयोजित करणेत आली आहे.

ठामपा/पिआरओ/परिवहन/११४/२०२४-२५ सही/-
दि.११.०७.२०२४ परिवहन व्यवस्थापक
PLS VISIT OUR OFF. WEBSITE परिवहन सेवा,ठा.मपा.ठाणे
www.thanecity.gov.in



### नवी मुंबई महानगरपालिका

**विद्युत विभाग**

**निविदा सुचना क्र.का.अ(वि)परी-2/03/2023-2024**

**कामाचे नाव :- नमुंमपाती अधिकारी/कर्मचारी यांच्या कार्यालयीन कामकाजाकरीता गुगल वर्कस्पेस (ई-मेल सोल्युशन्स) उपलब्ध करुन घेण्याबाबत.**

**अंदाजित रक्कम रु. :- 22,08,000/-**

**इसारा अनामत रक्कम (रु.). :- 22,100/-**

**निविदा पुस्तीका ई-निविदा (E-tendaring) सगणक प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर व नमुंमपाच्या www.nmmc.gov.in संकेत स्थळावर दिनांक- 12/07/2024 रोजी प्राप्त होतील. निविदेचे सादरीकरण https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर Online करण्याचे आहे. ई-निविदा (E-tendering) प्रक्रियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणींसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबर वर संर्कक करावे.**

**कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त , नवी मुंबई मानगरपालिका यांनी राखुन ठेवला आहे.**

सही/-
**श्री. प्रविण हिंदुराव गाडे**
**कार्यकारी अभियंता (वि-2)**
**नवी मुंबई महानगरपालिका**

जाक्र-नमुंमपा/मजसंवि/जाहिरात/53/2024


## लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळणार हे कसं ओळखणार ?

**(पान १ वरून)** **दुसरी अंतिम यादी जाहीर केली जाणार** – आलेल्या सर्व हरकतींचे तक्रार निवारण समितीकडून निराकरण करण्यात येईल. त्यानंतर पात्र लाभार्थ्यांची अंतिम यादी जाहीर केली जाईल. पात्र आणि अपात्र लाभार्थ्यांची स्वंतत्र यादी अंगणवाडी केंद्र, ग्रामपंचायत, वॉर्ड स्तरावर, सेतू सुविधा केंद्रावर तसेच पोर्टल आणि ॲपवरही जाहीर केली जाईल. अंतीम यादीत पात्र विभागात नाव असलेल्या महिलांनाच या योजनेचा लाभ दिला जाईल.


Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

### Public Notice

Service Request Number : THN/12041/18/24
Inquiry/case No. : ACC/III/557/2024
Name of the Trust : आदि स्वामी समर्थ चॅरिटेबल ट्रस्ट

**Address of the Trust :** फ्लॅट नं. जी/३०२, गोल्डन जुबली बिल्डींग, वेदांत नक्षत्र, रमेशवाडी, बदलापूर (प.), ठाणे, अंबरनाथ, बदलापूर,
**Name of the Applicant :** श्री. राजू दिनकर भोसले,

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only (In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only (In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 04/07/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane



Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

### Public Notice

Service Request Number : THN/01650/18/24
Inquiry/case No. : ACC/III/287/2024
Name of the Trust : लेट झहिर गुलाम मोहमद डांगे ट्रस्ट

**Address of the Trust :** मसजिद ओल्ड मसजिद चाळ, बंदर रोड, कल्याण (प.), जि. ठाणे, ठाणे, कल्याण, कल्याण
**Name of the Applicant :** श्री. नदीम जहीर डांगे

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only (In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only (In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 10/07/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane


## खांद्यावर भगवा ध्वज घेत टाळ वाजवत खा. श्रीकांत शिंदे दिंडीत सहभागी




**(पान १ वरून)** वारकरी आषाढी एकादशीच्या निमित्ताने शेकडो दिंड्यांच्या माध्यमातून विठू–रखुमाईच्या नामाचा जयघोष करत पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करत आहेत. यातील संत तुकोबा माउलींची, संत ज्ञानेश्वर माउलींची पालखी मार्गात हजारो वारकरी एकत्र येऊन पांडुरंगाच्या नामाचा जयघोष करत असतात. महाराष्ट्राला लाभलेल्या या वारीच्या परंपरेत अनेक मान्यवर मंडळी देखील आवर्जून सहभाग होत असतात. गेल्या वर्षी प्रमाणे कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी यंदा देखील या वारीत सहभाग घेतला.
खासदार डॉ. शिंदे यांनी यांनी आज तरडगाव ते फलटण या मार्गावर श्री ज्ञानेश्वर माउलींच्या पालखीच्या मार्गावर सर्व वारकऱ्यांसमवेत पायी चालत वारीत सहभाग घेतला. तसेच ज्ञानेश्वर माउलींच्या पालखीचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी डॉ. शिंदे यांनी वारकरी संप्रदायाचा भगवा ध्वज खांद्यावर घेऊन टाळ वाजवत सर्व वारकरी बांधवांसमवेत विठ्ठलाच्या नामाचा जयघोष केला. यावेळी खासदार शिंदे यांनी वारकऱ्यांशी संवाद साधला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यंदा वारकऱ्यांसाठी अनेक उपायोजना राबविल्या आहेत.
विशेष दिंड्यांना आर्थिक साहाय्य, वारकऱ्यांसाठी आरोग्य विमा, दिंड्यांच्या मार्गावर ठिकठिकाणी पिण्याच्या पाण्याची सुविधा, मोफत औषधोपचार यांसारख्या उपायोजना राबविण्यात आल्या आहेत. या सर्व उपाययोजनांमुळे यंदाची वारी ही आनंदाची वारी ठरली असल्याचे मत यावेळी वारकरी बांधवांनी व्यक्त केले. या प्रसंगी शिवसेनेचे खासदार श्रीरंग बारणे, शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेनेचे अक्षय महाराज भोसले, तसेच मोठ्या संख्येने शिवसैनिकांनी देखील वारीत सहभाग घेतला.


### मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता. जि. ठाणे - ४०१ १०१

जा.क्र. मनपा/मबाक /२२/२०२४-२५ दि. ११/०७/२०२४

**// फेर–निविदा सुचना //**

मिरा–भाईंदर महानगरपालिका खालील कामांकरीता निविदा मागवित आहे. सदर कामाचे कोरे निविदा फार्मकरीता दि. १२/०७/२०२४ ते दि. १९/०७/२०२४ रोजी १.०० वाजेपर्यंत http://mahatenders.gov.in च्या संकेत स्थळावर उपलब्ध होतील. निविदाधारकाने निविदा फॉर्म फी व इसारा रक्कम ऑन लाईन रिसीप्ट सिस्टीमद्वारे भरणाा करावी. कामाचा अनुभव व अटीशर्ती निविदा फॉर्म मध्ये नमुद केलेल्या प्रमाणे असावीत.
सदर कामी मागविलेल्या मोहोरबंद निविदा दि. २२/०७/२०२४ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत वरील संकेतस्थळावर स्विकारण्यात येतील. दि. २२/०७/२०२४ रोजी दुपारी १.०० वाजता उघडण्यात येतील. तसेच कोणतेही कारण न देता कोणतीही एक निविदा स्वीकारण्याचा अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | कोरे निविदा पत्रकाची किंमत (रुपये) | निविदा बयाणा रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | अॅडव्हान्स ब्युटीपार्लर (दोन दिवसाची कार्यशाळा)<br>१) बाईडल फेशियल/हायड्रा फेशियल (लोटस)<br>२) केसांची आधुनिक उपचार पध्दती–ब्राझिलियन बोटॉक्स आणि नोप्लास्टीक | १७००+१८ % GST = २००६ (Non Refundable) | ८५००/– |

टिप :–
१. निविदा पत्रके पोस्टाने पाठविले जाणार नाहीत. तसेच निविदाही पोस्टाने स्विकारल्या जाणार नाही.
२. सर्व निविदा केवळ ऑनलाईन स्विकारल्या जातील.
३. निविदा बयाणा रक्कम व निविदा फॉर्म फी ऑनलाईन रिसिट सिस्टिमद्वारे स्विकारण्यात येतील यांची नोंद घ्यावी.

ठिकाण :– भाईंदर
दि.
जा. क्र. मनपा/मावज/ E–२३२१९६५/२०२४–२५
दि. ११/०७/२०२४

सही/–
कल्पिता पिंपळे
उप आयुक्त (मबाका)
मिरा भाईंदर महानगरपालिका



सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
(संस्था रजिस्टर कार्यालय)
वेस्ट व्यू बिल्डिंग, राम मारुती रोड, गजानन महाराज मंदिर जवळ, ठाणे (पश्चिम) – ४००६०२
''चोकशी नोटीस''
नोंदणी क्रमांक: इ– १४३९ / ठाणे
फेरफार बदल क्रमांक: ACC–२ / ८३४ / २०२४
ट्रस्टचे नाव: श्री मीरा रोड अचलगच्छ जैन संघ
पत्ता : फ्लॅट क्रमांक ००४, तल मजला, इमारत क्रमांक A/३९, सेक्टर III, आकाश दर्शन शांतीनगर CHS. लि., शांतीनगर, मीरा रोड (पूर्व), ठाणे – ४०११०७.

सदर कार्यालयामध्ये वरील क्रमांकाचा फेरफार बदल १८/०६/२०२४ रोजी दाखल केला असून सन : ०१/०४/२०२१ ते ३१/०३/२०२४ या कालावधीतील खालील प्रमाणे सदस्यांची नावे कमी करण्यात आली आहेत आणि ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२७ या कालावधीकरता खालील सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

| ०१/०४/२०२१ ते ३१/०३/२०२४ | ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२७ |
|---|---|
| १) किशोर जेठालाल सावला | १) पियुष लक्ष्मीचंद गाला |
| २) जयेश टोकरशी हरिया | २) जयेश टोकरशी हरिया |
| ३) सुरेश जेठालाल गाला | ३) सुरेश जेठालाल गाला |
| ४) भावेश मुरजी देधिया | ४) अंकुर प्रविण गाला |
| ५) विशाल लक्ष्मीचंद विरा | ५) विशाल लक्ष्मीचंद विरा |
| ६) जयंतीलाल केशवजी गडा | ६) किशोर जेठालाल सावला |
| ७) लहरचंद रमनिकलाल गाला | ७) लहरचंद रमनिकलाल गाला |
| ८) पियुष लक्ष्मीचंद गाला | ८) गीरा विरल व्यास |
| ९) संजय केशवजी व्होरा | (९) अल्पा जयेश गडा |
| १०) अंकुर प्रविण गाला | १०) किंजल वसंतलाल गडा |
| ११) निखिल मनीलाल गडा | ११) निखिल मनीलाल गडा |

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास हरकत घ्यावयची असेल तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीस दिवसाच्या आत वरील कार्यालयचे पत्त्यावर पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफीयत न आल्यास कोणांस काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
ही नोटीस माझे सहीनीशा सहाय्यक धर्मादाय आयुक्त सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय विभाग ठाणे यांचे सही शिक्यनीशी आज दिनांक १०/ ७/ २०२४ रोजी दिली आहे.

शिक्का

सही/–
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
ठाणे विभाग ठाणे

ठाणे, शुक्रवार दि. १२ जुलै २०२४ वर्ष : १३, अंक : ७५ , पाने : ६, किंमत : २ रुपये
Maharashtra Samrat | Maharashtra Samrat | dainikmahasamrat@gmail.com | Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे
संपादक : चंद्रकांत भोईटे



अग्रलेख
**प्रशासकीय अधिकारी की नव वतनदारी ?**
पुण्यात असलेल्या ट्रेनी आयएएस अधिकारी पूजा खेडकर या त्यांच्या वेगवेगळ्या कारनाम्यांमुळे चर्चेत आहेत. वरिष्ठ जिल्हाधिकाऱ्यांचे अँटी चेंबर बळकावणे, रुजू होण्याआधीच व्हॉट्स ॲप ......पान २ वर



मुंबई नाशिक महामार्गावरील कामांची जिल्हाधिकारी शिनगारे यांनी केली पाहणी ...पान ४ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**
कमाल ३६° से | किमान २९° से

**बाजार**
सोने ७३,२८० | चांदी ९३,६८०

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



आमच्या पक्षात तुमचे स्वागत असो. तुम्हाला नवीन पद देण्याची व्यवस्था लवकरच केली जाईल.

# आज विधान परिषद निवडणूक



**लोकसभेसाठी होत असलेली आज (१२ जुलै) महाराष्ट्र विधानपरिषद निवडणूक ही सत्ताधारी पक्ष भाजपसाठी लिटमस टेस्टपेक्षा कमी नाही. ऑक्टोबर किंवा नोव्हेंबर महिन्यात राज्यात विधानसभा निवडणुका होणार असल्याने लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर भाजपसह महायुतीकडून क्रॉस व्होटिंग होऊ नये, यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत. विधानपरिषद निवडणुकीत ११ जागांसाठी १२ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. पहिल्या पसंतीची २३ मते असणार आहेत. अशा स्थितीत प्रत्येक पक्ष २३ चा कोटा पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील आहे. महाराष्ट्र विधानसभेत भाजपचे १०३ आमदार आहेत. राष्ट्रवादीचे (अजित पवार) ४० आमदार आहेत. शिवसेनेचे (एकनाथ शिंदे) ३८ आमदार आहेत. त्याचबरोबर शिवसेना, राष्ट्रवादी आणि भाजप या महायुतीला १० हून अधिक आमदारांचा पाठिंबा आहे.** (पान २ वर)

## 11 जागांसाठी 12 उमेदवार रिंगणात

महाराष्ट्र विधान परिषदेच्या ११ जागांसाठी आज १२ जुलै रोजी मतदान होणार आहे. १२ उमेदवार रिंगणात आहेत. मतांचे विभाजन टाळण्यासाठी शिवसेना शिंदे गट, भाजप, उद्धव ठाकरे, अजित पवार यांच्या राष्ट्रवादीने आपल्या आमदारांना हॉटेलमध्ये ठेवले आहे. कसभा निवडणुकीच्या निकालानंतर महाविकास आघाडीचा वरचष्मा दिसत आहे. मात्र, विधानपरिषद निवडणुकीत महायुती वरचढ आहे. महायुतीला ११ पैकी ९ जागांवर विजय मिळत असल्याचे दिसत असले तरी लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर बदललेल्या वातावरणात शिवसेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे काही आमदार पक्ष बदलतील हे नाकारता येणार नाही. तसे झाल्यास त्याचा फायदा महाविकास आघाडीला होईल.

तर समाजवादी पक्ष आणि एआयएमआयएमचे एकूण ३ आमदार आहेत. अशा परिस्थितीत त्यांनी महाविकास आघाडीला साथ दिल्यास त्यांच्या विजयाची शक्यता आणखी वाढणार आहे. मात्र, एआयएमआयएमची रणनीती अद्याप स्पष्ट झालेली नाही. याशिवाय बच्चू कडू यांचा प्रहार जनशक्ती पक्ष आणि प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीचे एकूण ६ आमदार आहेत. त्यांनी दिलेला पाठिंबा आणि विरोध याचा परिणाम महाविकास आघाडीच्या विजयावर होऊ शकतो.

### क्रॉस व्होटिंगचा सर्वात मोठा धोका कोणाला?

क्रॉस व्होटिंगचा सर्वात मोठा धोका राष्ट्रवादीच्या आमदाराकडून (अजित पवार) वर्तवला जात असून लोकसभा निवडणूक झाल्यापासून अजित पवारांचे आमदार शरद पवारांच्या संपर्कात असल्याचे बोलले जात आहे. तसे झाल्यास त्याचा बदल आगामी विधानसभा निवडणुकीवर सुद्धा परिणाम होऊ शकतो.

### भाजपाचे उमेदवार


पंकजा मुंडे


परिणय फुके


अमित गोरखे


योगेश टिळेकर


सदाभाऊ खोत

### शिवसेना (एकनाथ शिंदे)


भावना गवळी


कृपाल तुमणे

### राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार)


राजेश विटेकर


शिवाजीराव गर्जे

### काँग्रेस


डॉ. प्रज्ञा राजीव सातव

### शेकाप


जयंत पाटील

### शिवसेना-उबाठा


मिलिंद नार्वेकर

# NEET-UG परीक्षा पुन्हा होणार?




सुप्रीम कोर्टात NEET-UG प्रकरणी आज महत्त्वपूर्ण सुनावणी होणार आहे. डउ विद्यार्थ्यांच्या याचिकांवर ही सुनावणी होणार आहे. याचिकेत कथित पेपर लीक प्रकरणाची फेरतपासणी आणि योग्य तपास करण्याची मागणी विद्यार्थ्यांकडून करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश धनंजय यशवंत चंद्रचूड, न्यायमूर्ती जेबी परडीवाला आणि न्यायमूर्ती (पान २ वर)

### केंद्र आणि NTA च्या प्रतिज्ञापत्रात काय?

छएएढ-णत्रृ प्रकरणी विद्यार्थ्यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत कथित पेपर लीक प्रकरणाची फेरपरीक्षा आणि योग्य तपास करण्याची मागणी करण्यात आलीय. सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड, न्यायमूर्ती जेबी परडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर वैद्यकीय प्रवेश परीक्षेतील अनियमिततेशी संबंधित याचिकांवर सुनावणी सुरू आहे. केंद्र आणि छढ- ने ५ मे रोजी झालेल्या परीक्षेत कोणत्याही प्रकारची मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाली नसल्याचं म्हटलं आहे. आता उइखने ही सर्वोच्च न्यायालयात उत्तर दाखल केले आहे. बुधवारी केंद्र सरकार आणि छढ- यांनी प्रतिज्ञापत्र दाखल केले होते. केंद्र सरकारने नीट परीक्षा पुन्हा घेणार नसल्याचं आधीच न्यायालयाला सांगितले आहे.

### मागच्या सुनावणीत सुप्रीम कोर्ट काय म्हणाले?

न्यायालयाने केंद्र आणि एनटीएला प्रश्नपत्रिका सुरक्षित कशी ठेवली, ती परीक्षा केंद्रावर कशी पाठवली आणि संभाव्य प्रश्नपत्रिका कशी लीक होऊ शकते अशी विचारणा केली होती. या संपूर्ण प्रक्रियेबाबत तुमची शपथपत्रे दाखल करा असं कोर्टाने म्हटलं होतं. कथित पेपरफुटीच्या परिणामावर न्यायालय समाधानी नसेल, तर शेवटचा उपाय म्हणून फेरपरीक्षेचे आदेश दिले जातील, असेही न्यायालयाने म्हटले होते.

### NTA च्या प्रतिज्ञापत्रात काय म्हटलंय..

कथित अनियमितता केवळ पाटणा आणि गोधरा केंद्रांमध्येच घडली आहे. वैयक्तिक उदाहरणांच्या आधारे संपूर्ण परीक्षा रद्द करू नये. जास्त गुण मिळवणारे विद्यार्थी मोजक्याच केंद्रांवरून येतात, असे म्हणणे चुकीचे आहे. या गैरप्रकारात सहभागी विद्यार्थ्यांचे निकाल रोखून धरण्यात आले असून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई आणि हकालपट्टीसाठी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

# कल्याणमधील ६३ एकर जमीन बिल्डरच्या घशात

**कल्याणमध्ये मोठा जमीन घोटाळा झाल्याचा गंभीर आरोप विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. याबाबत माहिती देताना ते म्हणाले आहेत की, कल्याण तालुक्यातील मौजे म्हारळ येथे एका कंपनीने शासकीय जमीन अनाधिकृतपणे बिगरशेती केली. म्हारळ सामुदायिक शेती सहकारी संस्थेला हाताशी धरुन, गरीब व गरजवंत शेतकऱ्यांची फसवणूक करुन, सुमारे सात हजार कोटी रुपयांचा सुनियोजित घोटाळा जिल्हाधिकारी, ठाणे व महसूल विभागातील अधिकारी यांच्या संगनमताने केला आहे.**

## ७००० कोटींचा घोटाळा

### विजय वडेट्टीवार यांचा गंभीर आरोप



या प्रकरणाची एक महिन्याच्या आत चौकशी करावी व म्हारळ सामुदायिक शेती सहकारी संस्थेला दिलेली ६३ एकर जमिन महसूल विभागाने ताब्यात घ्यावी, अशी मागणी विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. विधानसभेत आज विजय वडेट्टीवार यांनी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या अनुषंगाने सभागृहाचे या विषयाकडे लक्ष वेधले.

विजय वडेट्टीवार म्हणाले, म्हारळ सामुदायिक शेती सहकारी संस्थेने २००८ रोजी केवळ १२ दिवसातच हा भूखंड महसूल (पान २ वर)



ठाणे शहरात सुरु असलेले मेट्रोचे काम त्यातच भर पावसाळ्यात सुरू असलेल्या रस्ते दुरुस्ती कामांसाठी वारंवार वाहतुक बदलांचा जाच सुरू असताना गुरुवारी सकाळी नाशिक-मुंबई महामार्गावर भला मोठा ट्रक आणि घोडबंदर रोडवर अवजड कंटेनर बंद पडला. त्यामुळे ठाण्यात वाहतुक कोंडी झाली. ऐन वर्दळीच्या वेळी झालेल्या वाहतुक कोंडीमुळे प्रवाश्यांना इच्छित स्थळ गाठताना मोठी कसरत करावी लागली. रस्त्यांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने चाकरमानी खोळंबले. या खोळंब्यामुळे घोडबंदर रोड,नाशिक - मुंबई महामार्ग, मुंब्रा बायपास, ठाणे-बेलापूर, मुंबई आग्रा रोड, पूर्वद्रुतगती महामार्गासह ठाणे शहरातही कोंडीचा परिणाम जाणवला. (छाया - मनोज सिंह)

## थोडक्यात घडामोडी

### जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत गट- क सरळ सेवा भरती २०२३: पुढील टप्प्यातील परिक्षा १८ जुलै पासून सुरू

ठाणे - जिल्हा परिषद गट क सरळसेवा पदभरती प्रक्रिया २०२३ मध्ये आतापर्यंत विविध संवर्गातील परिक्षा पार पडलेल्या आहेत. पुढील टप्प्यात ठाणे जिल्ह्यातील परिक्षा केंद्राची निवड केलेल्या आरोग्य सेवक (पुरुष) ४०%, आरोग्य सेवक (पुरुष) ५०% (हंगामी फवारणी क्षेत्र कर्मचारी), आरोग्य परिचारिका (आरोग्य सेवक (महिला)), कंत्राटी ग्रामसेवक, मुख्य सेविका/ पर्यवेक्षिका या संवर्गातील बिगर पेसा क्षेत्रातील परिक्षा १८ जुलै ते ३० जुलै पर्यंत होणार आहेत. जिल्हा परिषद ठाणे कार्यालयातील अधिकृत संकेतस्थळावर परिक्षे संदर्भात वेळोवेळी प्राप्त झालेल्या सूचना उमेदवारांसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे.सरळ सेवा भरती पुढील टप्प्यातील परिक्षा १८ जुलै रोजी मुख्य सेविका/ पर्यवेक्षिका, १९ व २३ जुलै रोजी आरोग्य परिचारिका (आरोग्य सेवक (महिला)), २०, २२ व २३ जुलै रोजी आरोग्य सेवक (पुरुष) ४०%, १९ व २४ जुलै रोजी आरोग्य सेवक (पुरुष) ५०% (हंगामी फवारणी क्षेत्र कर्मचारी), २५, २९ व ३० जुलै रोजी कंत्राटी ग्रामसेवक या पदाची परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यासाठी उमेदवारांना जिल्हा परिषद ठाणे कार्यालयातील अधिकृत संकेतस्थळावरून माहिती घेण्याचे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे. परीक्षेसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांना परिक्षेचे हॉल तिकीट उपलब्ध करून देण्यात येत आहे. परीक्षेसाठी अर्ज केलेल्या. (पान २ वर)

# कंत्राटी महिला कर्मचाऱ्यांचाही लाडकी बहीण योजनेत समावेश करावा

### आमदार निरंजन डावखरे यांची विधान परिषदेत मागणी

ठाणे - मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत राज्य सरकारमध्ये कंत्राटी पद्धतीने अल्प वेतनावर कार्यरत असलेल्या महिला कर्मचाऱ्यांचाही समावेश करावा, अशी आग्रही मागणी भाजपाचे आमदार निरंजन डावखरे यांनी आज विधान परिषदेत केली. त्याचबरोबर व्यावसायिक शिक्षणाप्रमाणेच कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेत पदवीचे शिक्षण घेणाऱ्या मुलींना फी माफ करावी, अशी मागणी श्री. डावखरे यांनी केली.

राज्याच्या अर्थसंकल्पावरील विधान परिषदेतील चर्चेत भाजपाचे आमदार निरंजन डावखरे सहभागी झाले होते. विकासाचा दृष्टीकोन ठेवून राज्याला दिशा देणारा हा अर्थसंकल्प आहे, अशा शब्दांत आमदार डावखरे यांनी अर्थसंकल्पाला पाठिंबा दिला. या अर्थसंकल्पातून आध्यात्मिक वारसा जपण्याचे महत्वपूर्ण कार्य होणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

राज्यातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना क्रांतीकारी ठरेल. या योजनेत २१ ते ६५ वयोगटाचा समावेश झाला असला, तरी वयोमर्यादा ८० करावी, अशी मागणी आमदार डावखरे यांनी केली. तसेच राज्य सरकारच्या विविध विभागात अल्प मानधन वा वेतनावर कार्य करणाऱ्या महिला कंत्राटी कर्मचाऱ्यांनाही योजनेचा लाभ द्यावा. कंत्राटी कर्मचाऱ्यांचे उत्पन्न लक्षात घेऊन त्यांच्या समावेशाचा निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

व्यावसायिक शिक्षणासाठी मुलींना १०० टक्के शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क माफ करण्यात आले. राज्यात पदवीचे शिक्षण लाखो मुली घेत आहेत. त्यांचे शुल्क माफ करावे, अशी मागणीही आमदार डावखरे यांनी केली.

मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना १० हजार रुपये विद्यावेतन देण्याच्या निर्णयाबद्दल आमदार डावखरे यांनी आभार व्यक्त केले. तसेच राज्यातील शिक्षकांना जनगणना व बीएलओची कामे देण्याऐवजी बेरोजगार पदवीधर युवक-युवतींना द्यावीत, अशी मागणीही आमदार डावखरे यांनी केली.

# खांद्यावर भगवा ध्वज घेत टाळ वाजवत खा. श्रीकांत शिंदे दिंडीत सहभागी

**डोंबिवली : विठुरायाच्या दर्शनाची ओढ वारकऱ्यांसह सर्वच भक्तांना लागली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सुपुत्र तथा कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी मंगळवारी तरडगाव ते फलटण या संत ज्ञानेश्वर माउलींच्या पालखीच्या मार्गावर सर्व वारकऱ्यांसमवेत पायी चालत वारीत सहभाग घेतला. तसेच ज्ञानेश्वर माउलींच्या पालखीचे मनोभावे दर्शन घेतले.**





डोंबिवली : विठुरायाच्या दर्शनाची ओढ वारकऱ्यांसह सर्वच भक्तांना लागली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सुपुत्र तथा कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी मंगळवारी तरडगाव ते फलटण या संत ज्ञानेश्वर माउलींच्या पालखीच्या मार्गावर सर्व वारकऱ्यांसमवेत पायी चालत वारीत सहभाग घेतला. तसेच ज्ञानेश्वर माउलींच्या पालखीचे मनोभावे दर्शन घेतले.

यावेळी खासदार डॉ. शिंदे यांनी वारकरी संप्रदायाचा भगवा ध्वज खांद्यावर घेऊन टाळ वाजवत सर्व वारकरी बांधवांसमवेत विठ्ठलाच्या नामाचा जयघोष केला. या प्रसंगी शिवसेनेचे खासदार श्रीरंग बारणे, शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेनेचे अक्षय महाराज भोसले, तसेच मोठ्या संख्येने शिवसैनिकांनी देखील वारीत सहभाग घेतला. राज्यभरातून लाखो (पान २ वर)

# लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळणार हे कसं ओळखणार?

**मुंबई : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळावण्यासाठी महिला मोठ्या प्रमाणात अर्ज करत आहेत. अर्जासाठी लागणारी कागदपत्रे काढण्यासाठी महिला तहसील कार्यालयांत गर्दी करत आहेत. दरम्यान, या योजनेतून येत्या १५ ऑगस्टला पात्र महिलांना पहिला हफ्ता दिला जाणार आहे. मात्र त्याआधी एखादी महिला पात्र की अपात्र हे कसे ठरवले जाणार? त्यासाठीची प्रक्रिया काय आहे? सरकारकडून जारी केल्या जाणाऱ्या दोन याद्यांचा नेमका अर्थ काय आहे? हे जाणून घेणं गरजेचं आहे.** (पान २ वर)

### तात्पुरत्या यादीचा नेमका अर्थ काय?

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी महिलांना अर्ज करण्याचे आवाहन केले जात आहे. महिलांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर एकूण दोन याद्या प्रसिद्ध केल्या जातील. तशी माहिती २८ जून रोजीच्या शासन निर्णयात देण्यात आली आहे. या माहितीनुसार महिलांचे अर्ज मिळाल्यानंतर शासनाकडून अर्जदार महिलांची एक तात्पुरती यादी जाहीर केली जाणार आहे. ही यादी पोर्टल, ॲपवर जाहीर केली जाईल. या तात्पुरत्या यादीची प्रत अंगणवाडी केंद्र, ग्रामपंचायत आणि वॉर्ड स्तरावरील सूचना फलकावरही लावण्यात येईल.

### तक्रार निवारणासाठी वेगळी समिती

पात्र लाभार्थी महिलांची यादी जाहीर केल्याच्या दिनांकापासून पाच दिवसांपर्यंत सर्व हरकत, तक्रार नोंदविणे आवश्यक आहे. नोंदवण्यात आलेल्या हरकतींचे निवारण करण्यासाठी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक तक्रार निवारण समिती स्थापन केली जाईल.

### तात्पुरत्या यादीवर घेता येणार हरकत

त्यानंतर या तात्पुरत्या यादीवर काही हककत असेल तर ती पोर्टल किंवा ॲपद्वारे करता येईल. याशिवाय अंगणवाडी सेविका, मुख्यसेविका, सेतू सुविधा केंद्र यांच्या मार्फत बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे लेखी हरकत किंवा तक्रार करता येईल. ऑफलाईन प्राप्त झालेल्या हरकती, तक्रारी एका रजिस्टरमध्ये नोंदवल्या जातील आणि ऑनलाईन अपलोड केल्या जातील.



### मुख्यमंत्र्यांना 'लाडकी बहीण' तर आम्ही कोण? तृतीयपंथीयांचा सवाल

मुख्यमंत्र्यांना लाडकी बहीण आहे, तर आम्ही कोण आहोत? असा प्रश्न जालन्यात तृतीयपंथीयांनी मुख्यमंत्र्यांना विचारला आहे. तसेच, आम्हाला देखील लाडकी बहीण योजनेचा लाभ व्हावा, अशी मागणी तृतीयपंथीयांनी केली आहे. आम्ही देखील समाजाचे घटक आहोत, आम्हाला देखील मतदानाचा अधिकार आहे. त्यामुळे आम्हाला ही योजना का लागू होत नाही? असा प्रश्न या तृतीयपंथीयांनी उपस्थित केला आहे.

## उपविभागीय दंडाधिकारी, ठाणे विभाग, ठाणे यांचे कार्यालय, ठाणे

पत्रव्यवहाराचा पत्ता :- २१७, दुसरा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे कोर्ट नाका,
ठाणे (पश्चिम ठाणे) ४०० ६०१ दुरध्वनी क्र. : ०२२-२५३४५११०

क्र.टिडी/फौज/टे-४/ज्युरी/ठाणे-नवी मुंबई-भाईंदर/कावि-०७/२०२४ दिनांक -०५/०७/२०२४

### जाहिरनामा

सदर जाहीर नोटीसीव्दारे जनतेस आव्हान करण्यात येते की, ठाणे उपविभागाअंतर्गत ठाणे, नवी मुंबई व मिरा-भाईंदर या तीन महानगरपालिका असुन त्यामध्ये एकुण ०२ उपविभागीय पोलीस अधिकारी, ०६ (सहा) सहाय्यक पोलीस आयुक्त आहेत. यांचेकडुन माहे एप्रिल २०२४ ते जून २०२४ या कालावधीत खालील तक्यात नमुद मयत व्यक्तींच्या प्रकरणांची अकस्मात मृत्यू समरी नोंद मंजूर होणेबाबत कळविले आहे. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १७४ अन्वये सदर व्यक्तींच्या मृत्युच्या दर्शनी कारणांचा अहवाल संबंधीत पोलीस विभागाकडुन या कार्यालयास प्राप्त झाला असुन त्याबाबत चौकशी सुरु आहे. त्यानुसार त्यांचेकडील प्राप्त प्रकरणांनुसार मयत इसमांची यादी मयतांच्या मृत्यूचे कारण व नातेवाईक/खबर देणाऱ्याच्या नावासह खालील तक्यात नमुद केलेली आहे.

| अ.क्र | एस आर क्रमांक | पोलीस स्टेशन नाव | एडीआर क्रमांक | मयताचे नाव | वय | मृत्यूचे कारण | नातेवाईक/खबर देणा-याचे नांव | मृत्यूचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १८९/२४ | रबाळे | ७३/२०२३ | बजरंग साधु मानकर | ६२ | Asphyxial Death due to hanging | सुनिता बजरंग मानकर | अनैसर्गिक |
| २ | १९०/२४ | रबाळे | १२७/२०२३ | राधाबाई रोहिदास कांबळे | ७५ | Death due to drowning | बाई दौलप्पा | अनैसर्गिक |
| ३ | १९१/२४ | रबाळे | १००/२०२३ | रघुनाथ आटुगडे | ५२ | Asphyxia due to hanging | राजु रघुनाथ आटुगडे | अनैसर्गिक |
| ४ | १९२/२४ | रबाळे | १३२/२०२२ | गणेश उलगाणाथन कोनार | ३३ | Septocemia following injuries sistaomed in a known case of retroviral disease. | क्रिष्णन उलगाणाथन कोनार | अनैसर्गिक |
| ५ | १९३/२४ | रबाळे | ५०/२०२२ | विलास देवराम निकुळे | ४८ | उंचावरुन खाली पडल्याने मानेस व मणक्यास जखम होवुन | राजेश विलास निकुळे | अनैसर्गिक |
| ६ | १९४/२४ | रबाळे | ९६/२०२३ | रंजित शिवाजी म्हसवेकर | २८ | Asphyxia due to hanging | श्रध्दा रंजित म्हसवेकर | अनैसर्गिक |
| ७ | १९५/२४ | रबाळे | ८८/२०२३ | काजल अर्जुन सोळंकी | २५ | Septicmic shock due to Burns | प्रमिला पंजाब गुंदी | अनैसर्गिक |
| ८ | १९६/२४ | रबाळे | १२३/२०२३ | अविनाश शामराव आहीरे | ५१ | Asphyxia due to hanging | कांतीलाल शामराव आहीरे | अनैसर्गिक |
| ९ | १९७/२४ | रबाळे | ९९/२०२३ | दत्तात्रय ग्यानदेव सनस | ३१ | गळफास घेतल्याने | दिपाली दत्तात्रय सनस | अनैसर्गिक |
| १० | १९८/२४ | रबाळे | १२५/२०२३ | हरिष कैलास रोकडे | २७ | Asphyxia due to hanging | मयुर कैलास रोकडे | अनैसर्गिक |
| ११ | १९९/२४ | रबाळे | १३२/२०२३ | सुग्रीव रामाश्रय कुशवाह | २२ | गळफास घेतल्याने | रंजीत नंदलाल कुशवाह | अनैसर्गिक |
| १२ | २००/२४ | रबाळे | १६०/२०२३ | विलास एकनाथ पाटील | ४० | Asphyxial death due hanging | योगेश विलास पाटील | अनैसर्गिक |
| १३ | २०१/२४ | रबाळे | १९१/२०२३ | तानाजी गोविंद पाटील | ४२ | Asphyxial Death due to Hanging | पांडुरंग गोविंद पाटील | अनैसर्गिक |
| १४ | २०२/२४ | रबाळे | २०१/२०२३ | नाना देविदास पाटील | ५० | Asphyxial Death due to Hanging | रोशन उर्फ जॉन नाना पाटील | अनैसर्गिक |
| १५ | २०३/२४ | रबाळे | १९७/२०२३ | चंद्रकांत विजय पेशट्टीवार | ४२ | Death due to hanging | योगिता चंद्रकांत पेशट्टीवार | अनैसर्गिक |
| १६ | २०४/२४ | रबाळे | १०/२०२४ | साईनाथ कुबेर शेरखाने | १७ | Asphyxial Death due to Hanging | लक्ष्मी कुबेर शेरखाने | अनैसर्गिक |
| १७ | २०५/२४ | रबाळे | १८४/२०२३ | सोमनाथ दिलीप बनसोडे | २९ | Head Injury | सुनिल काशीनाथ नाईक | अनैसर्गिक |
| १८ | २०६/२४ | रबाळे | १०८/२०२३ | महेंद्र विनायक गोरे | ४९ | Head injury in the form of fracture of skull bones with intracranial hamorrhage | निशा महेंद्र गोरे | अनैसर्गिक |
| १९ | २०७/२४ | रबाळे | १४०/२०२३ | मारुती अप्पाराव वानी | ४५ | Asphyxial due to hanging | वनीता मारुती वानी | अनैसर्गिक |
| २० | २०८/२४ | रबाळे | ८३/२०२३ | राज संतोषकुमार गुप्ता | १९ | Hyporolumic shock due to ३० to ३५% superficial to deep thermal burn | संतोषकुमार गणेश गुप्ता | अनैसर्गिक |
| २१ | २०९/२४ | रबाळे | ०५/२०२४ | बोक्तीयार सुभान शेख | ३८ | Asphyxia due to hanging | नुर इस्लाम मोहम्मद रिजाउल शेख | अनैसर्गिक |
| २२ | २१०/२४ | रबाळे | १७५/२०२३ | कृतीका योगेश चव्हाण | १८ | Shock and hemorrhage due to polytrauma | सुधाकर धुलसिंग चव्हाण | अनैसर्गिक |
| २३ | २११/२४ | शिळ डायघर | ०९/२०२३ | कृष्णा भिमा बंडीवडार | ३० | Asphyxia due to hanginag | श्रीनिवास भिमा बंडीवडार | आत्महत्या |
| २४ | २१२/२४ | शिळ डायघर | ११/२०२४ | गोपीनाथ बाळु म्हात्रे | ६० | गळफास घेतल्याने | नितेश गोपीनाथ म्हात्रे | आत्महत्या |
| २५ | २१३/२४ | शिळ डायघर | ९९/२०२३ | राधाबाई विश्वनाथ पाटील | ७५ | Death due to Drowning | राहूल मधुकर पाटील | अपघाती |
| २६ | २१४/२४ | वाशी | ७७/२०२१ | कांता नारायणदास कामवानी | ६३ | Cerebero-pulmonary oedema due to carbamate insecticide propoxur poisoning | पोकॉ/२६१८ अर्जुन तेजमल चव्हाण | अनैसर्गिक |
| २७ | २१५/२४ | वाशी | ७८/२०२१ | मोहीनी नारायणदास कामवानी | ८७ | Cerebero-pulmonary oedema due to carbamate insecticide propoxur poisoning | पोकॉ/२६१८ अर्जुन तेजमल चव्हाण | अनैसर्गिक |
| २८ | २१६/२४ | वाशी | ७९/२०२१ | दिलीप नारायणदास कामवानी | ६७ | Cerebero-pulmonary oedema due to carbamate insecticide propoxur poisoning | पोकॉ/२६१८ अर्जुन तेजमल चव्हाण | अनैसर्गिक |
| २९ | २१७/२४ | वाशी | ७३/२०२२ | अजहर मलिक सय्यद | १९ | Death due to Polytrauma | मलिक गफुर सय्यद | अनैसर्गिक |
| ३० | २१८/२४ | वाशी | ६८/२०२३ | गणेश मोहन चिकाटे | २६ | Asphyxia due to hanging | हौसेराव राजाराम घागरे | अनैसर्गिक |
| ३१ | २१९/२४ | वाशी | ७८/२०२३ | किशोरी किशोर जैन | ५२ | Death due to drowning | पोहवा/२१२३ भाऊसाहेब बन्सी होलगिर | अनैसर्गिक |
| ३२ | २२०/२४ | वाशी | ८३/२०२३ | आशुतोष मोहन गोबाळे | २२ | Asphyxial Death due to Hanging | मोहन वैजनाथ गोबाळे | अनैसर्गिक |
| ३३ | २२१/२४ | वाशी | ८५/२०२३ | महादेव श्रीपत लोखंडे | ४९ | Asphyxial Death due to Drowing | पांडुरंग श्रीपत लोखंडे | अनैसर्गिक |
| ३४ | २२२/२४ | वाशी | ९१/२०२३ | शिल्पा रमेश एकावडे | २३ | Asphyxial Death due to Hanging | रमेश बापु एकावडे | अनैसर्गिक |
| ३५ | २२३/२४ | वाशी | १३/२०२४ | सुरेश किशोरीमल पंजवानी | ६९ | Hemorrhoge and shock due to polytrouma | साहील सुरेश पंजवानी | अनैसर्गिक |
| ३६ | २२४/२४ | श्रीनगर | ०३/२०२४ | अभिजित कांताराम वाडेकर | २४ | Cause of death hanginag asphyxia | पोहवा/१६६२ डी.ई.शिरसाठ | आत्महत्या |
| ३७ | २२५/२४ | श्रीनगर | ०९/२०२४ | गणपती माणीक जानकर | ४५ | Death due to the Head rauye | पोहवा/३३३४ उमेश यशवंत दळवी | अपघाती |
| ३८ | २२६/२४ | श्रीनगर | २४/२०२४ | अविनाश एकनाथ फसले | २८ | Death caused due to asphyxia due to ligature mark around neck | एकनाथ शशीराव फसले | आत्महत्या |
| ३९ | २२७/२४ | श्रीनगर | ६४/२०२३ | सोनु बिनेश ढकोलीया | ३५ | इलेक्ट्रीक शॉक लागुन | मोनु बिनेश ढकोलीया | अपघाती |
| ४० | २२८/२४ | वागळे इस्टेट | ०१/२०२४ | अक्षय युवराज मजदे | २० | Asphyxia due to hanginag | चेतन रंजीत कांबळे | आत्महत्या |
| ४१ | २२९/२४ | वागळे इस्टेट | ०६/२०२४ | रामेश्वर नानाभाउ मोरे | ५७ | Death due to all Asplana Due to See Hanging | आदित्य रामेश्वर मोरे | आत्महत्या |
| ४२ | २३०/२४ | वागळे इस्टेट | ०२/२०२४ | रिशी सुधीर निषाद | १७ वर्ष ४ महिने | Death Caused due to Asphyxia due to Hangning | सुनिल निठुरी निषाद | आत्महत्या |
| ४३ | २३१/२४ | कळवा | ३१९/२०२३ | संगिता रविंद्र शिर्के | ५३ | Asphyxia due to hanginag | रविंद्र दत्तु शिर्के | आत्महत्या |
| ४४ | २३२/२४ | कळवा | ३३८/२०२३ | आसीफ नुरक सय्यद | ६ | Asphyxia due to drowning | सफीया नुरक सय्यद | अपघाती |
| ४५ | २३३/२४ | कळवा | ३९/२०२३ | संदीप मारुती ठोंबरे | ३९ | Death due to multiple Organ Failure due to Rogan Poison, Poisioning Leading to Shock | मोहन नारायण कचरे | आत्महत्या |
| ४६ | २३४/२४ | कळवा | २१८/२०२३ | अमित धोंडू सखाराम उतेकर | ३२ | Asphyxia due to hanging | धोंडू सखाराम उतेकर | आत्महत्या |
| ४७ | २३५/२४ | कळवा | १२/२०२३ | नेत्रा जितेंद्र गवते | २१ | Asphyxia due to hanging | जितेंद्र नारायण गवते | आत्महत्या |
| ४८ | २३६/२४ | कळवा | १९९/२०२३ | अनंत वना तपिसर | ४२ | Haemorrhage and shock due to blunt thoracic trauma to | पोना/६९१७ आय.आर.खान | अपघाती |
| ४९ | २३७/२४ | कळवा | २३६/२०२३ | दिलु मोहम्मद शेख | ३९ | Asphyxia due to hanging | रविउल दिलु शेख | आत्महत्या |
| ५० | २३८/२४ | मुंब्रा | २४५/२०२३ | नजरुल बहादुर मलिक | ५५ | Came Death for Acute Myocardial Infaction | ताजरुल मजारुल मलिक | अपघाती |
| ५१ | २३९/२४ | मुंब्रा | ६६/२०२२ | ध्रुव दिपक गुळवे | १ वर्ष २ महिने | डोक्यास मार लागुन | दिपक विठ्ठल गुळवे | अपघाती |
| ५२ | २४०/२४ | मुंब्रा | ३०५/२०२३ | पिंटु उर्फ पंकजकुमार बाबुभाई कमलिया | ३२ | गळफास घेतल्याने | सोनल पिंटू कमलिया | आत्महत्या |
| ५३ | २४१/२४ | मुंब्रा | १६/२०२४ | सलमान जमील मलीक | ३४ | गळफास घेतल्याने | आसीफ मो.इस्तीयाम सलमानी | आत्महत्या |
| ५४ | २४२/२४ | कळवा | ७०/२०२४ | राकेश रामशिरोमणी विश्वकर्मा | ४५ | गळफास घेतल्याने | सुनिता राकेश विश्वकर्मा | आत्महत्या |
| ५५ | २४३/२४ | कळवा | ९८/२०२४ | राहणा रुस्तम हास्मी | ५२ | गळफास घेतल्याने | रुस्तम अली हस्मी | आत्महत्या |
| ५६ | २४४/२४ | मुंब्रा | २९३/२०२३ | आरव चंद्रकांत जाधव | ७ | Shock due to cranio-cerebellar injury in a case of fall from height | दिलीप गोविंद जाधव | अपघाती |
| ५७ | २४५/२४ | कळवा | ४२/२०२४ | अनिता अशोक बाट्टी | २४ | Death due to Asphyxia due to Hanging | अशोक अनुमंता बाट्टी | आत्महत्या |
| ५८ | २४६/२४ | मुंब्रा | ११८/२०२१ | अनोळखी बेवारस इसम | अंदाजे ४० वर्ष | Death due to drowning | अनिल हनुमान सिंग | आत्महत्या |
| ५९ | २४७/२४ | मुंब्रा | २६४/२०२१ | दिपाली संदिप गायकर | २६ | Asphyxia due to hanging | संदिप बाळकृष्ण गायकर | आत्महत्या |
| ६० | २४८/२४ | मुंब्रा | ११७/२०२२ | समीर उत्तम सामुई | ३१ | Asphyxia due to hanging | दशरथ जगदंब बेरा | आत्महत्या |
| ६१ | २४९/२४ | मुंब्रा | ०२/२०२२ | किशोर शरद जाधव | २५ | गळफास घेतल्याने | सुरज शरद जाधव | आत्महत्या |
| ६२ | २५०/२४ | मुंब्रा | १८२/२०२१ | सिमा चंद्रकांत कांबळे | ३२ | Death due to drowning | चंद्रकांत हिरु कांबळे | आत्महत्या |
| ६३ | २५१/२४ | मुंब्रा | २४६/२०२३ | आशीष संजय जाधव | २२ | गळफास घेतल्याने | अनिकेत संजय जाधव | आत्महत्या |
| ६४ | २५२/२४ | मुंब्रा | २५१/२०२३ | राजन विजयप्रकाश मिश्रा | २८ | गळफास घेतल्याने | विजयप्रकाश धर्मराज मिश्रा | आत्महत्या |
| ६५ | २५३/२४ | मुंब्रा | ३१३/२०२२ | सुजाता शरद नाईक | ४१ | Carniocerebal Injury Associated with injury to the spine due to blunt trauma | शरद दामोदर नाईक | अपघाती |
| ६६ | २५४/२४ | मुंब्रा | १६९/२०२२ | राजकुमार लखन सिंग | ३० | गळफास घेतल्याने | दिपक राजाराम सावंत | आत्महत्या |
| ६७ | २५५/२४ | मुंब्रा | २४/२०२४ | चंद्रकांत विजय पिसे | २६ | Asphyxia due to hanging | सुभाष विजय पिसे | आत्महत्या |
| ६८ | २५६/२४ | मुंब्रा | ३५५/२०२३ | रविंद्र शिवाजी शिंदे | २५ | Asphyxia due to hanging | किरण कुमार शिवाजी | आत्महत्या |
| ६९ | २५७/२४ | मुंब्रा | १५५/२०२१ | मोहम्मद हसन अब्दुल जब्बार मोमीन | ७१ | Head injury in an alleged case of fall from heigh | अब्दुल रज्जाक मोहम्मद हसन मोमीन | अपघाती |
| ७० | २५८/२४ | मुंब्रा | १५२/२०२१ | रोहीत राकेश शुक्ला | १९ | Death due to Electrocution | राकेश कमलाकर शुक्ला | अपघाती |

उपरोक्त नमुद मयत इसमांच्या मृत्यूच्या कारणाबाबत फौजदारी प्रकिया संहिता, १९७३ चे कलम १७६ (२) नुसार मयत व्यक्तीचे मृत्युचे कारण दर्शविणारे आदेश व चौकशी करणे प्रस्तावित आहे.

तरी संबंधित मयत इसमांच्या मृत्युबाबत त्यांचे नातेवाईक, हितसंबंधित अथवा अन्य कोणासही संशय/तक्रार/हरकत असल्यास याबाबतचे म्हणणे किंवा त्याबाबतचे पुरावे/साक्ष देणेची असल्यास संबंधितांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्या पासुन ०७ दिवसांचे आत उपविभागीय दंडाधिकारी ठाणे विभाग ठाणे, पत्ता- २१७, दुसरा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे कोर्ट नाका, ठाणे (पश्चिम) येथे कार्यालयीन वेळेत हजर राहुन आपले म्हणणे तोंडी अथवा लेखी स्वरुपात सादर करावे असे आव्हान जाहिर नोटीसीव्दारे आम जनतेस करण्यात येत आहे. विहीत मुदतीत कोणाच्याही हरकती/तक्रार प्राप्त न झाल्यास या संदर्भात कोणाचीही हरकत नाही असे ग्राहय धरुन अकस्मात मृत्यु समरी मंजुरी बाबतचे आदेश निर्गमित करणेत येतील.

सही/-
( उर्मिला पाटील )
**उपविभागीय दंडाविकारी**
**ठाणे उपविभाग ठाणे**







कळवा रुग्णालयात २१ नवजात बालकांची मृत्यू झाल्याची घटना समोर आल्यानंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आक्रमक भूमिका घेत हॉस्पिटलचे अधिष्ठाता यांना जाब विचारला यावेळी शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख केदार दिघे,शहरप्रमुख प्रदीप शिंदे आदींसह शिवसेनेचे कार्यकर्ते सहभागी झाले होत. (छाया : मनोज सिंह)

## मुंबई नाशिक महामार्गावरील कामांची जिल्हाधिकारी शिनगारे यांनी केली पाहणी

ठाणे : मुंबई नाशिक महामार्गावरील खड्डे व ब्रिजच्या सुरू असलेल्या कामांची पाहणी करुन या मार्गावरील खड्डे तात्काळ बुजविण्याच्या सूचना जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी संबंधित ठेकेदार यांना दिल्या.
यावेळी पोलीस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी, महामार्ग सुरक्षा पथकाचे पोलीस अधीक्षक मोहन पवार, भिवंडी उप विभागीय अधिकारी अमित सानप, वाहतूक विभागाचे उप आयुक्त विनयकुमार राठोड, जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी, एमएमआरडीए कार्यकारी अभियंता श्री.किस्ते तसेच संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी शिनगारे यांनी ब्रिजची प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण करावी. कामे पूर्ण करीत असताना वाहतूकीची कोंडी होणार नाही, याची काळजी घ्यावी, अशाही सूचना संबधित अधिकाऱ्यांना दिल्या.

**रूग्ण संख्येत वाढ, काळजी घेण्याचे प्रशासनाचे आवाहन**

# ठाणे जिल्ह्यात डेंग्यु, मलेरियाने डोके वर काढले

ठाणे : जिल्ह्यात एकीकडे पावसाने जोर धरला असतानाच विविध शहरात डेंग्यु आणि मलेरियाच्या रूग्णसंख्येतही वाढ होत असल्याचे चित्र आहे. ठाणे जिल्ह्यात गेल्या काही दिवसात ३२ हून अधिक रूग्णांची शासनाच्या दफ्तरी नोंद झाली आहे. मात्र यात रूग्णांची संख्या अधिक असण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाकडून नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन केले जाते आहे.

ठाणे जिल्ह्यात गेल्या काही दिवसात पावसाने चांगला जोर धरला. त्यामुळे जिल्ह्यातील जलसाठ्यांमध्ये हळुहळू वाढ होते आहे. पावसामुळे मोकळ्या आणि सखल भागात पाणीही साचते आहे. नैसर्गिक नाले प्रवाही झाले आहेत. त्याचवेळी शहरात रहिवासी भागांमध्ये मोकळ्या, सखल भागात, निर्माणाधीन इमारती, मोडकळीस आलेल्या आणि बंद घरांमध्येही पाणी साचू लागले आहे. परिणामी डासांची उत्पत्ती वाढून रोगराई पसरण्यास सुरूवात झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यात डेंग्यु आणि मलेरियाच्या रूग्णांची संख्या वाढल्याचे दिसून आले आहे. ठाणे जिल्ह्यात गेल्या महिनाभरात ३२ रूग्णांची नोंद झाली आहे. यातील डेंग्यु सदृश्य रूग्णांची संख्या मोठी आहे. अनेक जण लक्षणे दिसल्यास खासगी स्तरावर उपचार घेत असल्याने अशा अनेकांची नोंद स्थानिक पालिका प्रशासनाच्या लेखी नाही. गेल्या आठवडाभरात ठाणे जिल्ह्यात १० डेंग्यु रूग्णांची नोंद झाल्याची माहिती जिल्हा आरोग्य विभागाने दिली आहे. मात्र त्याचवेळी कुळगाव बदलापूर नगरपालिकेच्या आरोग्य विभागात एकट्या बदलापूर शहरात १२ डेंग्यु रूग्णांची नोंद झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील डेंग्यु रूग्णांची संख्या अधिक असण्याची शक्यता आहे. त्यातही एकाच घरात एकापेक्षा अधिक रूग्णांची नोंद झाल्याचेही समोर आले आहे. त्यामुळे डेंग्युच्या रूग्णांची संख्या वाढण्याची भिती व्यक्त होते आहे. तर जिल्ह्यात मलेरियाच्या रूग्णांची संख्याही २० वर जाऊन पोहोचली आहे. त्यामुळे काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनातर्फे केले जाते आहे. जिल्हा आरोग्य विभागाकडून साथीच्या आजारांचा फैलाव रोखण्यासाठी विविध उपायोजना राबविण्यात येत आहे. या अंतर्गत ताप उद्रेकाच्या ठिकाणी जलद ताप सर्वेक्षण करण्यात येत आहे. हिवताप बाधित रुग्ण आढळ्यास त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचे देखील रक्त तपासणी साठी पाठवण्यात येत आहेत. तर भिवंडी मध्ये इतर शहरांतून कामासाठी येणाऱ्या मजुरांचे प्रमाण अधिक आहे. या मजुरांचे देखील सर्वेक्षण करण्यात येत आहे. तर ग्रामीण भागातील नाले, डबक्यांमध्ये गप्पी मासे सोडण्यात येत आहेत. तर ग्रामीण भागातील प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात गप्पी माशांचे एक पैदास केंद्र कार्यान्वित करण्यात येत आहेत.



### आरोग्य विभाग तपासणी पुरताच मर्यादीत

जिल्ह्यातील सर्वच महापालिकांमधील आरोग्य विभाग हा डेंग्युचे रूग्ण आढळ्यानंतर तपासणी करत रूग्ण आणि त्यांच्या कुटुंबियांना सल्ले देण्यापुरताच मर्यादीत असल्याचे दिसून येते आहे. रूग्ण आढळल्याची माहिती मिळाल्यानंतर आरोग्य पथक रूग्णाच्या घरी जाऊन साचलेल्या पाण्याचे साठे तपासते. एखादी कुंडी, पाण्याची भांडी आढळल्यास त्यावरून रूग्णाच्या कुटुंबियांना सुनावले जाते. मात्र त्याचवेळी इमारतींच्या शेजारी असलेली डबकी, निर्माणाधीन इमारतींचे मालक यांना मात्र समज दिली जात नसल्याची तक्रार नागरिक करत आहेत.

# एक अविस्मरणीय अनुभव





भिवंडी पूर्वचे आमदार रईस शेख यांच्या प्रयत्नाने भिवंडी महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातील प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील मराठी, हिंदी, तेलगू व उर्दू माध्यमाच्या मुलांना विधान भवनाचा दौरा आज दिनांक ८ जुलै २०२४ रोजी आयोजित केलेला होता. सदर अभ्यास दौऱ्यामध्ये एकूण ३९ विद्यार्थी सहभागी होते व त्या शाळांचे प्रतिनिधी म्हणून एक एक शिक्षकही त्यांच्यासोबत होते, तसेच या दौऱ्याची पाहणी करण्यासाठी आपल्या शिक्षण विभागाच्या उपायुक्त डॉ. अनुराधा बाबर व कार्यालयीन अधिक्षक स्वाती संखे ह्या देखील उपस्थित होत्या.

सर्व विद्यार्थ्यांना दोन्ही सभागृहे अत्यंत जवळून पाहता आली व त्या सभागृहात अर्धा अर्धा तास बसून आमदार साहेबांच्या सोबत राहून त्या सभागृहांची पाहणी करत आपल्या मनातील अनेक प्रश्न त्यांनी साहेबांना विचारले व त्यांची उत्तरे मिळवली.

या दौऱ्यादरम्यान विद्यार्थ्यांना सभापती नीलम गोऱ्हे मॅडम यांच्यासोबत चर्चा करण्याचा अनुभव व आनंद मिळाला. तसेच आमदार रईस शेख यांच्या प्रयत्नातून अदिती तटकरे, दादा भुसे, शंभूराज देसाई यासारखेआमदार व मंत्री यांच्यासोबत फोटो काढण्याचा व त्यांच्यासोबत बोलण्याचा निखळ आनंद देखील विद्यार्थ्यांना घेता आला.तसेच विद्यार्थ्यांनी दुरून का होईना परंतु उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, छगन भुजबळ व शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांना पहावयास मिळाले. या संपूर्ण प्रवासादरम्यान सन्माननीय आमदार रईस शेख यांच्यामार्फत सकाळी अल्पोपहार देण्यात आले. विशेष आनंदाची बाब म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याला आमदार साहेबांनी एक कीट गिफ्ट केले ज्यात एक रायटिंग पॅड, एक पाऊच, चॉकलेट चे पॅकेट व डोंमस चे रंगाचे सर्व साहित्य असलेले पाकीट दिले.

या संपुर्ण अभ्यास दौऱ्याचं आयोजनाबाबत सन्माननीय आमदार श्री रईस शेख साहेब यांनी सुचवल्यानंतर भिवंडी महापालिकेचे सन्माननीय आयुक्त अजय वैद्य साहेब यांनी त्याला दुजोरा देऊन याबाबतचा संपूर्णपणे पाठपुरावा अत्यंत वेगाने व तातडीने केला, त्यांच्या प्रयत्नांनी विद्यार्थ्यांना हा अनुभव घेता आला. तसेच शिक्षण मंडळाचे प्र. संबारी सर यांनी देखील परिश्रम घेतले. सर्व शिक्षक, विद्यार्थी यांच तर्फे सन्माननीय आमदार रईस शेख, सन्माननीय आयुक्त साहेब यांचे खूप खूप आभार मानण्यात आले.

### पालिका आयुक्त सौरभ राव यांनी केली पातलीपाडा येथील

# पालिका शाळेची पाहणी

ठाणे (गणेश भोईटे) : ठाणे महापालिकेच्या पातलीपाडा येथील शाळेची महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी गुरूवारी सकाळी पाहणी केली. या शाळेच्या इमारतीची प्रस्तावित दुरुस्ती आणि इतर कामांबद्दल आयुक्त राव यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.





पातलीपाडा येथे शाळेची तळ मजला अधिक दोन मजले अशी इमारत आहे. या इमारतीत महापालिकेची शाळा क्र. २१, २५, ५३ आणि ५४ यांचे वर्ग भरतात. या सर्व शाळांची एकत्रित पटसंख्या १६०० आहे. नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी वाढीव वर्ग खोल्यांची मागणीही शाळेच्या मुख्याध्यापकांनी केली आहे. या पार्श्वभूमीवर, महापालिका आयुक्त राव यांनी सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांसह संपूर्ण शाळेची पाहणी केली. या पाहणीच्यावेळी नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, उपायुक्त (शिक्षण) सचिन पवार, उपनगर अभियंता (पाणी पुरवठा) विनोद पवार, कार्यकारी अभियंता संजय कदम, भगवान शिंदे आदी उपस्थित होते.

आयुक्त राव यांनी शाळेच्या सर्व मजल्यांची पाहणी केली. इमारतीच्या गच्चीवर करण्यात आलेल्या कामांचीही त्यांनी पाहणी केली. या पाहणीदरम्यान आयुक्त राव यांनी मुख्याध्यापकांशी चर्चा केली. त्यानंतर, शाळेच्या सभोवतालच्या परिसराची स्वच्छता, कॉंक्रिटीकरण ताबडतोब करण्यात यावे. शौचालयांची मोठ्या प्रमाणावर दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे. तळमजल्यावरील काही भिंतींना ओल आलेली आहे. पाण्याचा प्रश्न आहे. इमारतही जुनी झालेली आहे. हे सर्व विषय लक्षात घेऊन शाळेच्या इमारतीच्या दुरुस्तीचा सर्वंकष प्रस्ताव तयार करण्यात यावा, असे निर्देश आयुक्त राव यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले. त्यात, सिव्हील, पाणी पुरवठा, विद्युत यंत्रणा, वाढीव वर्ग खोल्या, इमारतीची आवश्यक डागडुजी यासारख्या सर्व कामांचा अंतर्भाव करण्यात यावा, असेही आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

## ०५ ऑगस्ट रोजी नवी मुंबई पालिका लोकशाही दिन

नवी मुंबई : महाराष्ट्र शासन निर्देशानुसार नवी मुंबई महानगरपालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते.

माहे ऑगस्ट २०२४ महिन्याचा लोकशाही दिन दि. ०५ ऑगस्ट २०२४ रोजी होणार असून अर्जदारांनी विहित नमुन्यात आपला अर्ज दोन प्रतींमध्ये दि. १९ जुलै २०२४ पर्यंत आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे नावे 'लोकशाही दिनाकरीता अर्ज' असे दर्शनी भागी ठळकपणे नमूद करुन सादर करावयाचा आहे.

सदर अर्जात नमूद तक्रार / निवेदन हे वैयक्तिक स्वरुपाचे असावे. अर्ज एकाच विभागाशी संबंधित एकाच विषयाबाबत असावा. अर्जदाराने संबंधित विषयाबाबत या आधी विभाग कार्यालय, विभागप्रमुख स्तरावर निवेदन सादर केलेले असावे. याशिवाय लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व/ अपिल, सेवाविषयक- आस्थापनाविषयक बाबी याबाबतचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी. विहित नमुन्यात नसणारे व अर्जासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तसेच तक्रार / निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे नसेल तर तसेच यापूर्वीच अंतिम उत्तर दिलेले आहे/ देण्यात येणार आहे अशा प्रकरणी पुन्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्जही स्विकारले जाणार नाहीत याचीही नागरिकांनी नोंद घ्यावी असे सूचित करण्यात येत आहे.

लोकशाही दिनाकरीता करावयाच्या अर्जाचा विहित नमुना नागरिकांसाठी महानगरपालिका नूतन मुख्यालय इमारत, जनसंपर्क विभाग, तिसरा मजला, से. १५ ए, किल्लेगांवठाण जवळ, सी.बी.डी., बेलापूर येथे विनामूल्य उपलब्ध असून नवी मुंबई महानगरपालिकेचे संकेतस्थळ (Website) www.nmmc.gov.in यावरील डाऊनलोड आयकॉनवरून अर्ज नमुना प्रत सहजपणे डाऊनलोड करुन घेता येऊ शकते याची नागरिकांनी नोंद घ्यावी असे आवाहन करण्यात येत आहे.

## कळव्यात पालिकेच्या सार्वजनिक स्वच्छतागृहावर अनधिकृत मोबाईल टॉवर

### अनधिकृत टॉवरच्या मागे कोणाचा आशीर्वाद

कळवा : ठाणे महापालिका क्षेत्रात उंच इमारतीवर सध्या विविध मोबाईल कंपन्यांचे बेकायदा मोबाईल टॉवर उभारले गेले आहेत त्यावर कोणतीही



सध्या कारवाई होताना दिसत नाही त्यावर कोर्टात ही जागृत नागरिकांनी जनहित याचिका दाखल केली आहे असे असताना आता चक्क कळव्यातील सायबानगर परिसरात झोपडपट्टीतील नागरिकांसाठी नाल्याच्या कडेला बांधण्यात आलेल्या एका स्वच्छतागृहावर एका खाजगी ठेकेदाराने मोबाईल टॉवर उभारला आहे.या स्वचछतागृहांत येथे झोपडपट्टीत राहणारे शेकडो गरीब नागरिक प्रात विधीसाठी जातात असे असताना महापालिका सार्वजनिक बांधकाम विभागाकडे कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे मोबाईल टॉवर उभारला आहे याला कोणत्या राजकीय पक्षांच्या नेत्यांचे व महापालिका अधिकाऱ्यांचे वरदहस्त आहे हे गुलदस्त्यात असून मात्र यातून मिळणारे वर्षातून लाखो रुपयांचे भाडे महापालिकेच्या तिजोरीत तर जात नाही मग खाजगी ठेकेदार नक्की कोणासाठी वसूल करतो ? या कडे येथील नागरिकांनी लक्ष वेधले आहे जागा महापालिकेची असताना बांधलेल्या सार्वजनिक स्वचछतागृहांवर टॉवर बांधण्याची परवानगी खाजगी ठेकेदाराला कोणी दिली व त्यावर कारवाई का होत नाही यावर प्रश्नावर महापालिका अधिकारी व येथील स्थानिक नगरसेवक मूग गिळून शांत बसल्याने येथील नागरिकांकडून आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

हे स्वच्छतागृह नाल्याच्या कडेला असल्याने वर्षभर येथे ओलावा असतो तसेच सध्या पावसाळा सुरू असल्याने पावसामुळे भिंती ओल्या होतात या स्वच्छतागृहा वरून या टॉवरसाठी वायरची जोडणी केली आहे. त्यामुळे येथे प्रातविधीसाठी येणाऱ्या नागरिकांसाठी हे धोक्याचे झाले आहे. तसेच हे स्वच्छतागृहांची बांधकामे बांधकाम ठेकेदार घाईघाईने उरकतात त्यामुळे हे बांधकाम काही दिवसांत धोकादायक होत असते त्यावर घातलेल्या स्लॅबची पडझड होत असते अश्यावेळी असा वजनदार मोबाईल टॉवर स्वच्छतागृहावर उभारणे धोकादायक आहे सद्या शहरात अनेक जुनी बांधकामे व स्लॅब कोसळण्याच्या घटना घडत आहेत अश्यावेळी सकाळच्या वेळी जर अशी एखादी घटना घडली तर मोठी दुर्घटना घडू शकते याकडे कळवा प्रभाग समितीतील सार्वजनिक बांधकाम विभाग व आरोग्य व घनकचरा विभाग दुर्लक्ष करीत आहे. तरी हा मोबाईल टॉवर त्वरित हटविण्याची मागणी परिसरातून होत आहे.

## कुत्रा चावल्यास आरोग्य केंद्रात जाऊन रॅबिजची लस घ्या

### पालिका आयुक्त अजय वैद्य यांचे आवाहन

भिवंडी : भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये अलिकडच्या काळात नागरीकांना कुत्रा चावण्याच्या (Dog Bite) घटनामध्ये वाढ झाल्यामुळे महानगरपालिकेच्या बीजीपी दवाखाना, सोनापूर मस्जिद, बंगालपूरा, भिवंडी. येथे -nti-Rabies इंजेक्शन व खपक्ष ढढ महानगरपालिकेकडून उपलब्ध करणेत आलेले आहेत.

सदरचे Anti-Rabies इंजेक्शन व Inj T. T. शासनाचे स्व. इंदिरा गांधी स्मृति उपजिल्हा रूग्णालय, कचेरीपाडा भिवडी येथे सुध्दा उपलब्ध आहेत.तरी नागरीकांना आवाहन करणेत येते की, कुत्र्याने दंश केलेल्या नागरीकांनी महानगरपालिकेच्या बीजीपी दावाखाना किंवा शासनाचे स्व. इंदिरा गांधी स्मृति उपजिल्हा रूग्णालय, कचेरीपाडा भिवंडी येथे जाऊन आरोग्य सुविधेचा लाभ घ्यावा. तसेच सदरचा संदेश आपले सहकारी सदस्य, नातेवाईक, मित्रपरिवार यांनादेखील कळवावे. त्याचप्रमाणे एखाद्या व्यक्तीला कुत्र्याने दंश केल्यास ठरलळशी चा अधिक प्रमाणात संसर्ग होऊ नये म्हणून प्रथम सदरची जखम स्वच्छ पाण्याने धुवावी व त्यानंतर महानगरपालिकेचा नजीकच्या आरोग्य केंद्रात किंवा शासनाचे रूग्णालयाचे ठिकाणी जाऊन आरोग्य सेवेचा लाभ घ्यावा, असे असे आवाहन पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी केले आहे.




मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या शुभहस्ते लाड-पागे समितीच्या शिफारसीनुसार एक व अनुकंप तत्वावर आठ दिवंगत कर्मचाऱ्यांच्या वारसांना महानगरपालिकातर्फे नियुक्ती पत्र देण्यात आले. प्रसंगी अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, उपायुक्त (मुख्यालय) रवि पवार उपस्थित होते. त्याचबरोबर अनुकंप तत्वावर लिपिक टंकलेखक या पदी भावेश सुहास लोकेगावकर व मृणाली विक्रांत पाटील यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. सफाई कामगार या पदी अलीकाडेश्वरी बाळमुर्गन, मनिषा तुषार समेळ, शक्तीवेल मुत्तूलिंगम, विजय विश्वनाथ स्वामी, संतोष रामा सोनावणे तर शिपाई या पदावर साक्षी महेंद्र बरफ यांना नियुक्ती पत्र देऊन त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिले.

## चावी विक्रेत्याला ३ लाखांची भरपाई

वसई : वसईतील चावी विक्रेत्याला मारहाण केल्याच्या घटनेची राज्य मानवाधिकार आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. याप्रकरणी चावी विक्रेत्याला नुकसानभरपाई म्हणून ३ लाख रुपये देण्याचे आदेश आयोगाने पोलीस आयुक्तांना दिले आहे. पोलिसांच्या दादागिरीवरही आयोगाने कडक ताशेरे ओढले असून याप्रकरणी कडक कारवाई करण्याचे निर्देश दिले आहे. मोह्मद अली अहमद अली अन्सारी (३५) यांचे वसईत चावी बनविण्याचे दुकान आहे. १६ मे रोजी अन्सारी यांच्या दुकानात एक इसर चावी बनविण्यासाठी आला होता. दोन चावी बनविण्याचे ८० रुपये झाले होते. मात्र त्याने केवळ ६० रुपये दिले. ठरलेल्या रकमेपैकी २० रुपये कमी दिल्याने अन्सारी आणि त्या ग्राहकात वाद झाला. शेवटी प्रकरण माणिकपूर पोलीस ठाण्यात गेले. तेथे असलेले पोलीस उपनिरीक्षक राजशेखर सलगरे यांनी फिर्यादी मोह्मद अन्सारी यांच्या मारहाण केली आणि त्यांच्या नाकावर जोराद ठोसा मारला. त्यामुळे अन्सारी यांचे नाक फ्रॅक्चर झाले होते.

## कामोठ्यात 'रयत'चे विभागीय कार्यालय ; लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन

पनवेल : अपेक्षेपेक्षाही चांगली इमारत या ठिकाणी उभी राहिली असल्याचे प्रतिपादन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी बुधवारी (दि. १०) रयत शिक्षण संस्थेच्या विभागीय कार्यालयाच्या उद्घाटनावेळी केले. कामोठे सेक्टर ११मध्ये रयत शिक्षण संस्थेचे व्यावसायिक कॉलेज सुरू होणार आहे. या प्रस्तावित कॉलेजच्या इमारतीचे काम प्रगतीपथावर असून या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर रयत शिक्षण संस्थेचे रायगड विभागीय कार्यालय बांधण्यात आले आहे. या कार्यालयाचे उद्घाटन रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते बुधवारी झाले.




या सोहळ्याला जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झाला.

या वेळी 'रयत' च्या महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुभदा नायक, लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडियम स्कूलच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे, कामोठ्यातील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे प्राचार्य अविनाश कुलकर्णी, विभागीय अधिकारी आर.पी. ठाकूर, सहाय्यक विभागीय अधिकारी शहाजी फडतरे, आर्किटेक नरेंद्र वाळुंज, विक्रम धुमाळ, शमा ठाकूर, ठेकेदार यशवंत डोंगरे, बाबुल दत्ता, हनुमंत पवार, विघ्नेश टोळे, यांच्यासह इतर शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.

## महाराष्ट्र भवनासाठी सिडको १२१ कोटी रुपये खर्च करणार

पनवेल : नवी मुंबई येथील वाशी रेल्वेस्थानकाजवळील सेक्टर ३० ए येथे सुमारे ८ हजार चौरस मीटरच्या भव्य भूखंडावर सिडकोने महाराष्ट्र भवन उभारण्यासाठी हालचाली सुरू केल्या असून लोकसभा आणि पदवीधर निवडणूकीची आचारसंहिता संपल्यावर १२१ कोटी रुपयांची निविदा यासाठी सिडको मंडळाने जाहीर केली आहे.

मागील १० वर्षांपासून वाशी स्थानक परिसरात विविध राज्यांची भवन उभारण्यात आली. याठिकाणी महाराष्ट्र भवन उभारण्याची मागणी लोकप्रतिनिधींकडून केली जात होती. लोकप्रतिनिधींच्या मागणीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या भवनासाठी होणाऱ्या खर्चातील ९० लाख रुपयांचा वस्तू व सेवा कर माफ केला होता. आ. मंदा म्हात्रे यांनी अनेक वर्षांपासून याबाबत शासनाकडे पाठपुरावा केला होता. वाशी परिसरात ओडिसा, मध्य प्रदेश, उत्तरप्रदेश, केरळ, राजस्थान, राज्यांच्या भवन इमारती दिमाखात उभ्या आहेत. परंतू महाराष्ट्र भवनाची इमारत येथे नसल्याने सरकारी प्रशासनातील अधिकाऱ्यांकडून सुद्धा येथे महाराष्ट्र भवन असावे अशी मागणी केली जात होती. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरु झाल्यानंतर अशा भव्य वास्तूची आवश्यकता सर्वाधिक परदेशाहून येणाऱ्या शिष्टमंडळाला भासणार आहे.

२०२२ मध्ये अर्थसंकल्पीय अधिवेशनात आ. म्हात्रे यांनी सरकारचे लक्ष वेधल्यावर तत्कालीन सरकारने १०० कोटींचा निधी या भवनासाठी मंजूर केल्याची घोषणा केली होती. काही महिन्यांपूर्वी महाराष्ट्र भवन इमारतीच्या आराखड्याचे सादरीकरण करण्यात आले. महाराष्ट्र भवनाची इमारत ही १२ मजल्यांची असेल. इमारतीच्या आराखड्यात राज्याचा सांस्कृतिक वारशाचे दर्शन भवनात प्रवेश केल्यावर सामान्यांना होईल. यासाठी भवनामध्ये विविध थोर पुरुषांचे पुतळे लावण्याऐवजी त्यांचे भव्य छायाचित्र लावण्यात येणार आहेत. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे दरबारामध्ये बसलेले छायाचित्र, जिजाऊमाता, छत्रपती शाहु महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले अशा थोर महात्मांचे छायाचित्र लावण्यात येणार आहेत. महाराष्ट्राचे खाद्य पदार्थ या भवनात मिळू शकतील. तसेच मोठ्या व लहान १६१ खोल्या भवनात असणार आहेत. भव्य सभागृहासोबत लहान सभागृह, इ वाचनालय, वाहनतळाची तरतूद भवनात केली आहे.

### दिवसभरात २५६ किलो प्लॅस्टिक जप्त; एकूण १ लाख २७ हजारांचा दंड वसूल

# ठाणे महापालिका कार्यक्षेत्रात सिंगल यूज प्लॅस्टिकबंदी मोहिम तीव्र

ठाणे : ठाणे महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभाग, अतिक्रमण विभाग आणि प्रदुषण नियंत्रण विभागामार्फत संपूर्ण ठाणे महापालिका कार्यक्षेत्रात सिंगल यूज प्लॅस्टिक बंदीबाबत आज कारवाई करण्यात आली. या कारवाईत एकूण २९३ आस्थापनांना भेटी देवून २५६ किलो सिंगल यूज प्लॅस्टिक जप्त करण्यात आले असून यापोटी एकूण १ लाख २७ हजार १०० रुपये इतका दंड वसूल करण्यात आला आहे. सदरची कारवाई महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या आदेशानुसार उपायुक्तांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दिवा प्रभाग समितीअंतर्गत ३२ आस्थापनांना भेटी देवून ०४ किलो सिंगल यूज प्लॅस्टिक जप्त करुन एकूण ६ हजारांचा दंड वसूल करण्यात आला. कळवा प्रभाग समितीअंतर्गत ३० आस्थापनांना भेटी देवून ११ किलो प्लॅस्टिक जप्त करुन एकूण १३ हजारांचा दंड वसूल करण्यात आला. मुंब्रा प्रभागसमितीअंतर्गत २३ आस्थापनांना भेटी देवून ५० किलो सिंगल यूज प्लास्टिक जप्त करुन एकूण ३० हजारांचा दंड वसूल करण्यात आला.

उथळसर प्रभाग समिती अंतर्गत एकूण ३५ आस्थापनांना भेटी देवून ३० किलो सिंगल यूज प्लॅस्टिक जप्त करुन एकूण ५७ हजारांचा दंड वसूल करण्यात आला. नौपाडा कोपरी प्रभागसमिती अंतर्गत २५ आस्थापनांना भेटी देवून ०८ किलो प्लॅस्टिक जप्त करुन १४ हजार. इतका दंड वसूल करण्यात आला. वागळे इस्टेट व लोकमान्य सावरकरनगर प्रभाग समिती अंतर्गत एकूण ६८ आस्थापनांना भेटी देवून २० किलो सिंगल यूज प्लॅस्टिक जप्त करुन एकूण ८




हजार १०० रु. इतका दंड वसूल करण्यात आला. वर्तकनगर प्रभाग समितीअंतर्गत एकूण ३५ आस्थापनांना भेटी देवून ०८ किलो सिंगल यूज प्लास्टिक जप्त करुन एकूण ९ हजार ५०० रु दंड वसूल करण्यात आला.

माजिवडा मानपाडा प्रभागसमिती अंतर्गत एकूण ४५ आस्थापनांना भेटी देवून एकूण १२५ किलो सिंगल यूज प्लॅस्टिक जप्त करुन एकूण ४१ हजार ५०० रु.




इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई दरम्यान प्रभागसमितीस्तरावरील उपमुख्यस्वच्छता यांच्यासह प्रभागसमितीतील कर्मचारी व सफाई कामगार उपस्थित होते. सिंगल यूज प्लॅस्टिकबंदीबाबतची कारवाई नियमितपणे शहरात सुरू राहणार असून नागरिकांनी सिंगल यूज प्लॅस्टिकचा वापर टाळावा असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

# सर्व प्रभागांमध्ये ‘मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण’ योजनेचे अर्ज नोंदणी कक्ष

## तातडीने सुरु करण्याचे आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांचे निर्देश








शिवसेना वागळे विभाग समन्वयक प्रकाश पालकर, शिवसेना शाखाप्रमुख किसन विश्वकर्मा, उपशाखाप्रमुख कल्पेश येवले.






नवी मुंबई : मुख्यमंत्री – लाडकी बहीण योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने ८ विभाग कार्यालयांप्रमाणेच महानगरपालिका वा शासकीय इमारतींमध्ये सर्व प्रभागांत अर्ज नोंदणी कक्ष तात्काळ सुरु करावेत व त्याची यादी नागरिकांच्या माहितीसाठी सर्व प्रसारमाध्यमांतून व्यापक स्वरुपात प्रसिध्द करावी असे निर्देश देत नमुंमपा आयुक्त डॉ..कैलास शिंदे यांनी एकही पात्र महिला लाभ घेण्यापासून वंचित राहू नये याची खबरदारी घ्यावी असे स्पष्ट निर्देश योजनेच्या आढावा बैठकीप्रसंगी दिले.

या योजनेचा लाभ घेण्याकरिता पात्र महिला ह्या नारीशक्ती दूत ॲपव्दारे स्वत: ऑनलाईन अर्ज भरु शकतात, तसेच ज्या महिलेला ऑनलाईन अर्ज भरता येत नाही त्या महिलांसाठी अर्ज भरण्याची सुविधा महानगरपालिकेने स्थापित केलेल्या विभाग कार्यालयातील विशेष नोंदणी कक्षामध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

या नोंदणी कक्षांची संख्या मोठया प्रमाणात वाढवून प्रत्येक प्रभागात किमान १ असे १११ नोंदणी कक्ष तात्काळ कार्यान्वित करावेत असे निर्देश आयुक्तांनी या बैठकीत दिले. त्याचप्रमाणे योजनेसाठी पात्र महिलांच्या सुविधेच्या दृष्टीने शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार या कक्षांची वेळ सकाळी ८ ते दुपारी २ आणि दुपारी २ ते रात्री ८ अशाप्रकारे २ सत्रात असावी असेही आयुक्तांमार्फत निर्देशित करण्यात आले.

योजनेकरिता भरण्यात येणारे अर्ज बिनचूक भरावेत व शासन निर्णयात नमूद केलेली पुराव्यांची आवश्यक ती योग्य कागदपत्रे तपासून अपलोड करावीत असेही निर्देश यावेळी देण्यात आले. एकही पात्र लाभार्थी महिला नोंदणी कक्षातून परत जाणार नाही याची दक्षता घ्यावी व अर्ज भरण्याची संपूर्ण कार्यवाही विनामूल्य होईल याची काटेकोर दक्षता घ्यावी असे स्पष्ट निर्देश आयुक्तांनी यावेळी दिले.

लाभार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन व ऑफलाईन दोन्ही प्रकारे घ्यावेत व ऑफलाईन घेतलेल्या अर्जांची पोहोच लाभार्थ्यांना द्यावी अशा सूचना देण्यात आल्या. यावेळी अतिरिक्त आयुक्त तथा शहर अभियंता श्री.शिरीष आरदवाड, समाजविकास विभागाचे उपआयुक्त श्री.किसनराव पलांडे, प्रशासन विभागाचे उपआयुक्त श्री.शरद पवार, शिक्षण विभागाच्या उपआयुक्त श्रीम.संघरत्ना खिल्लारे, वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे, परिमंडळ २ चे उपआयुक्त डॉ. कैलास गायकवाड आणि सर्व विभागांचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी तसेच शासनाच्या बालविकास प्रकल्प अधिकारी श्रीम.ज्योती पाटील आदी अधिकारी उपस्थित होते.

बालविकास विभागाच्या वतीनेही नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात २२६ अंगणवाड्या सुरु असून त्याठिकाणीही अर्ज भरण्याची सुविधा अंगणवाडी सेविकांमार्फत सुरु आहे. याशिवाय नवी मुंबई महानगरपालिकेची सर्व प्रभागांमध्ये अर्ज भरण्यासाठी नोंदणी कक्ष कार्यान्वित करण्यात येत आहेत.

मुख्यमंत्री - लाडकी बहीण योजनेची माहिती जास्तीत जास्त प्रसारित करावी व प्रत्येक पात्र लाभार्थ्याला त्याचा लाभ मिळेल अशाप्रकारे कार्यवाही करावी असे स्पष्ट निर्देश नमुंमपा आयुक्त डॉ कैलास शिंदे यांनी दिले.

घोडबंदर रोडवर विविध प्राधिकरणामार्फत सुरू असलेली

# कामे जलदगतीने पूर्ण करावीत : आयुक्त राव

**ठाणे (मेधा भोईटे) : मागील आठवडाभर घोडबंदर रोडवर होत असलेल्या वाहतूककोंडीच्या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी आज पूर्वद्रुतगती महामार्गावरील माजिवडा जंक्शन ते कापूरबावडी जंक्शनपर्यंत विविध प्राधिकरणामार्फत सुरू असलेल्या कामाचा आढावा घेतला. यावेळी मेट्रो प्राधिकरणामार्फत सुरू असलेली कामे तातडीने पूर्ण करावीत, तसेच विविध प्राधिकरणाच्या अखत्यारित असलेल्या रस्त्यांवरील खड्डे देखील दुरूस्त करण्याचे आदेश देत असतानाच सर्व प्राधिकरणाने समन्वयाने कामे करावीत असेही सूचित केले. यावेळी अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, नगरअभियंता प्रशांत सोनग्रा, वाहतूक पोलीस उपायुक्त विनयकुमार राठोड, सहाय्यक पोलीस आयुक्त ज्ञानेश्वर चव्हाण, आदी उपस्थित होते.**



यावेळी आयुक्तांनी ज्युपिटर हॉस्पिटल, माजिवडा नाका, कापूरबावडी परिसरात सुरू असलेल्या मेट्रोच्या कामाचा आढावा घेतला. विविध ठिकाणी मेट्रोच्या कामासाठी बॅरिगेटींग केलेले असल्यामुळे या ठिकाणी सातत्याने वाहतूक कोंडी होत असून या कामामध्ये बाधा न आणता वाहतूक कोंडी कशाप्रकारे सोडविता येईल या दृष्टीकोनातून नियोजन करावे. कापूरबावडी जंक्शनवर पेपर प्रॉडक्टस कंपनीलगत असलेल्या पुलावर गर्डर उभारण्याचे काम गेल्या अनेक दिवसापासून सुरू आहे, हे काम युद्धपातळीवर पुर्ण करुन सदरचा पूल वाहतूकीसाठी खुला करावा अशीही सूचना आयुक्तांनी यावेळी दिली.

तसेच पावसाळ्यामध्ये रस्त्यावर पडणारे खड्डे तातडीने बुजविता यावेत यासाठी महापालिकेकडून आपत्ती प्रतिसाद दल स्थापन करण्यात आले असून त्यांच्यामार्फत तातडीने उपाययोजना करण्यात येत आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील रस्ते हे कोणत्या प्राधिकरणाच्या अखत्यारित येतात हे न पाहता ज्या रस्त्यावर खड्डे पडले आहेत ते तातडीने बुजविण्यात येतील. पावसाळा दरम्यान करावयाच्या कामांबाबत सर्व प्राधिकरण समन्वयाने काम करुन नागरिकांना त्रास होणार नाही या दृष्टीने कार्यवाही करण्यात येईल असेही आयुक्तांनी यावेळी नमूद केले.

स्वच्छता व आरोग्याविषयी

## बालरोगतज्ज्ञ डॉ. माधवी इंगळे साधणार संवाद

नवी मुंबई : ‘स्वच्छ भारत मिशन’च्या वतीने ‘स्वच्छ सर्वेक्षण २०२४’ अंतर्गत ‘सफाई अपनाओ, बिमारी भगाओ’ अभियान हे १ जुलै ते ३१ ऑगस्ट या कालावधीत राबविण्यात येत असून या माध्यमातून स्वच्छता आणि आरोग्याचा परस्पर पूरक संबंध लक्षात घेत नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत व त्यामध्ये व्यापक लोकसहभाग करून घेण्यात येत आहे. या अनुषंगाने शालेय विद्यार्थ्यांवर उमलत्या वयातच स्वच्छतेचे संस्कार व्हावेत व त्यांच्यामध्ये आरोग्य जागरूकता वाढावी यादृष्टीने एक अभिनव ऑनलाईन उपक्रम राबविण्यात येत असून महानगरपालिकेच्या ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ डॉ. माधवी इंगळे विद्यार्थ्यांशी फेसबुक लाईव्ह व्दारे थेट संवाद साधणार आहेत.

जागतिक छायाचित्र दिनानिमित्त आयोजित ठाणे महापालिका चषक २०२४

## छायाचित्र स्पर्धेत जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे : आयुक्त

ठाणे : ’ठाणे महानगरपालिका आणि ठाणे शहर दैनिक पत्रकार संघ’ यांच्या संयुक्त विद्यमाने १९ ऑगस्ट या जागतिक छायाचित्र दिनानिमित्त ’ठाणे महापालिका चषक २०२४ या राष्ट्रीय छायाचित्र स्पर्धा हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे स्मारक, इटर्निटी सर्व्हिस रोड, तीन हात नाका येथे आयोजित केली आहे. या स्पर्धेस जास्तीत जास्त छायाचित्रकारांनी तसेच नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी आज झालेल्या पत्रकार परिषदेत केले.

ठाणे महापालिका चषक २०२४ या राष्ट्रीय छायाचित्र स्पर्धेची माहिती देण्यासाठी आज (११ जुलै) महापालिकेतील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या पत्रकार परिषदेस उपायुक्त उमेश बिरारी, उपायुक्त तथा क्रीडा अधिकारी मीनल पालांडे, ठाणे शहर दैनिक पत्रकार संघाचे अध्यक्ष आनंद कांबळे, सचिव नीलेश पानमंद, कार्याध्यक्ष विकास काटे, खजिनदार विभव बिरवटकर उपस्थित होते.

या स्पर्धेसाठी जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरुन आतापर्यत जवळ जवळ २१०० छायाचित्र प्राप्त झाली आहे. प्राप्त झालेल्या छायाचित्रांचे नामवंत छायाचित्रकारांकडून परीक्षण करण्यात येणार असून स्पर्धेतील विजेत्या व निवडक छायाचित्रांचे प्रदर्शन १७ ते २० ऑगस्ट २०२४ या कालावधीत भरविण्यात येणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिली. गेल्यावर्षी जवळपास ४६०० छायाचित्रकारांनी आपला सहभाग या स्पर्धेत नोंदविला असल्याचे आयुक्तांनी नमूद केले.

जि. प. ठाणे अंतर्गत गट- क सरळ सेवा भरती २०२३:

## पुढील टप्प्यातील परिक्षा १८ जुलैपासून सुरु

ठाणे : जिल्हा परिषद गट क सरळसेवा पदभरती प्रक्रिया २०२३ मध्ये आतापर्यंत विविध संवर्गातील परिक्षा पार पडलेल्या आहेत. पुढील टप्प्यात ठाणे जिल्ह्यातील परिक्षा केंद्राची निवड केलेल्या आरोग्य सेवक (पुरुष) ४०%, आरोग्य सेवक (पुरुष) ५०% (हंगामी फवारणी क्षेत्र कर्मचारी), आरोग्य परिचारिका (आरोग्य सेवक (महिला)), कंत्राटी ग्रामसेवक, मुख्य सेविका/ पर्यवेक्षिका या संवर्गातील बिगर पेसा क्षेत्रातील परिक्षा १८ जुलै ते ३० जुलै पर्यंत होणार आहेत. जिल्हा परिषद ठाणे कार्यालयातील अधिकृत संकेतस्थळावर परिक्षे संदर्भात वेळोवेळी प्राप्त झालेल्या सूचना उमेदवारांसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

सरळ सेवा भरती पुढील टप्प्यातील परिक्षा १८ जुलै रोजी मुख्य सेविका/ पर्यवेक्षिका, १९ व २३ जुलै रोजी आरोग्य परिचारिका (आरोग्य सेवक (महिला)), २०, २२ व २३ जुलै रोजी आरोग्य सेवक (पुरुष) ४०%, १९ व २४ जुलै रोजी आरोग्य सेवक (पुरुष) ५०% (हंगामी फवारणी क्षेत्र कर्मचारी), २५,२९ व ३० जुलै रोजी कंत्राटी ग्रामसेवक या पदाची परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यासाठी उमेदवारांना जिल्हा परिषद ठाणे कार्यालयातील अधिकृत संकेतस्थळावरून माहिती घेण्याचे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे.

परीक्षेसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांना परिक्षेचे हॉल तिकीट उपलब्ध करून देण्यात येत आहे. परीक्षेसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांनी जिल्हा परिषद ठाणे कार्यालयातील अधिकृत संकेतस्थळावरील आयबीपीएस द्वारे उपलब्ध करून दिलेल्या लिंकवरून हॉल तिकिट डाउनलोड करून घ्यावे. विशेष सुचना ज्या महिला उमेदवारांनी त्यांचे नाव बदलले आहे त्यांच्या बाबतीत त्यांनी मूळ राजपत्र अधिसूचना / त्यांचे विवाह प्रमाणपत्र सादर केल्यास परिक्षेस बसण्याची परवानगी दिली जाईल. अन्यथा महिला उमेदवारांना परिक्षेसाठी बसू दिले जाणार नाही याची दक्षता घ्यावी, अशी माहिती जिल्हा प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना

## अंमलबजावणी शहरात प्रभावीपणे करावी : पालिका आयुक्त वैद्य




भिवंडी : महिलांच्या आरोग्य व पोषण व त्यांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. महिलांचा श्रमसहभाग पुरुषांच्या तुलनेत कमी आहे. त्यामुळे त्यांच्या आर्थिक स्वातंत्र्यावर परिणाम होतो. सदर परिस्थिती लक्षात घेऊन राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी त्यांच्या आरोग्य पोषणामध्ये सुधारणा करण्यासाठी कुटुंबातील त्यांचे निर्णायक भूमिका समजून मजबूत करण्यासाठी राज्य शासनातर्फे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आलेली आहे. सदर योजना ही महानगरपालिका क्षेत्रात सुरू झाली असून जास्तीत जास्त महिलांना याचा लाभ मिळवून देणे आवश्यक आहे, त्याकरता सर्व पालिका कर्मचारी, अंगणवाडी सेविका यांनी शहरात जास्तीत जास्त प्रयत्न करून महिलांशी संपर्क साधून महिलांची नोंदणी करणे त्यांच्याकडून अर्ज भरून घेणे आवश्यक आहे.

या बैठकीस पालिका अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त समाज कल्याण प्रणाली घोंगे, सहाय्यक आयुक्त अजय एडके, जिल्हा बाल विकास प्रकल्प अधिकारी विवेक चौधरी, महिला व बालकल्याण प्रकल्प अधिकारी भिवंडी पश्चिम विभाग रंजना कंकाळ, वैजयंती पाटील महिला बालविकास प्रकल्प अधिकारी भिवंडी पूर्व विभाग, तसेच सर्व प्रभाग अधिकारी, अंगणवाडी सेविका व अन्य कर्मचारी उपस्थित होते.

पालिका आयुक्त पुढे म्हणाले की, राज्य शासनाचा हा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे याच्यात जास्तीत जास्त महिला लाभार्थी यांना लाभ मिळणे आवश्यक आहे. कोणतीही महिला लाभापासून वंचित राहणार नाही याकरता सर्वांनी प्रयत्न करावयाचे आहेत, जास्तीत जास्त महिलांनी याचा लाभ घ्यायचा त्याकरता त्यांना अर्ज भरणेकरिता मदत करणे ही बाब महत्त्वाची आहे. सर्व महिलांना या कामी सहकार्य करणे हे देखील आवश्यक आहे, या योजनेत कोणत्याही प्रकारची त्रुटी राहणार नाहीत याची दक्षता सर्व नियुक्त केलेले अधिकारी कर्मचारी वर्गाने घ्यावयाची आहे, असे देखील पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी नमूद केले.




‘महाराष्ट्र सम्राट’ हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ▪ RNI - MAHMAR/2012/44140 ▪ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१